सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. ०७ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ९५ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हरिनामाच्या गजराने दुमदुमली श्री विठ्ठलाची पंढरी, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महापूजा

## आषाढी एकादशीचा आज मुख्य सोहळा, पंढरीत जमली १५ लाखांवर वैष्णवांची मांदियाळी

सोलापूर : 'अवधे गर्जे पंढरपूर, चालला नामाचा गजर' अशा संतोक्तीची प्रचिती देत असलेला तीर्थक्षेत्र पंढरपुरच्या आषाढी सोहळा रविवारी भक्तिमय वातावरणात व प्रचंड उत्साहात साजरा होत आहे. संतांच्या पालख्या पंढरपुरात दाखल झाल्यामुळे सुमारे १५ लाखांहून अधिक भाविक पंढरीत दाखल झाले असून लाखो वैष्णवांची मांदियाळीने पंढरपूर भक्तिमय वातावरणात न्हाऊन गेले आहे, भाविकांच्या दाटीमुळे पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे. राज्यभरातून व परराज्यातून आलेल्या वैष्णवामुळे पंढरीत भाविकांचा महासागर उसळला असल्याचे चित्र दिसून येत आहे. श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मांच्या हस्ते रविवारी पहाटे पार पडली.

आषाढी मात्रा ही सर्वांत मोठी यात्रा असते. त्यामुळे या यात्रेनिमित्त शासकीय महापूजा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होत असते. मुख्यमंत्री शनिवारी मुंबईहून विमानाने सोलापुरात दाखल झाले व सोलापुरातून हेलिकॉप्टरने ते पंढरपूरकडे रवाना झाले. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज यांच्यासह विविध संतांच्या पालख्या मजल दरमजल करत शनिवारी रात्री पंढरीत दाखल झाल्या आहेत.



संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखीचे वाखरी येथील शेवटचे उभे रिंगण शुक्रवारी दुपारी संपल्यानंतर पालख्या वाखरी मुक्कामी आल्या होत्या. शनिवारी दुपारी पंढरपूरच्या वेशीवर विसावा मंदिर इसबावी येथे दाखल झाल्या.

आषाढी यात्रेकरिता आलेल्या भाविकांनी चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर परिसर, दर्शन राग व उपनगरीय भाग गजवाजला आहे. दर्शनरांगेत तीन लाखांहून अधिक भाविक आहेत. एका मिनिटाला जास्तीत जास्त भाविकांना दर्शन मिळत आहे. दर्शनासाठी जवळपास आठ ते दहा तासांचा कालावधी लागत आहे. चंद्रभागा नदीत मुबलक पाणी सोडण्यात आल्यामुळे भाविकांना स्नान करता येत आहे. या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जीवरक्षक दलाच्या स्पीड बोटी तैनात करण्यात आल्या आहेत. आठ हजारांहून अधिक पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. संपूर्ण पढरपूर यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वत सर्व पालखी सोहळ्याचे स्वा करण्यात आले. शहरावर सीसीटीव्ही कॅगेन्याची करडी नजर आहे. नगरपालिका, जिल्हा प्रशासन, वालुका प्रशासन याच्या वतीने वारीत येणाऱ्या लाखो भाविकांची विशेष काळजी घेण्यात येत आहे.

# पाकिस्तान भारतावर नजर ठेवण्यासाठी चीनकडून खरेदी करणार रडार

नवी दिल्ली: भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'ने पाकिस्तानला हादरवून टाकले आहे. भारतीय सैन्याच्या आक्रमक तयारीने आणि वेगाने वाढणाऱ्या लष्करी क्षमतेने, स्तब्ध झालेला पाकिस्तान आता चीनकडून आधुनिक केजे-५०० एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टीम खरेदी करण्याची योजना आखत आहे. भारताच्या यशस्वी 'ऑपरेशन सिंदूर'चा पाकिस्तानने जबरदस्त धसका घेतला आहे. या ऑपरेशनने भारताची स्ट्राइक क्षमता आणि त्याची तयारी संपूर्ण जगाला दाखवून दिली. यामुळे आपले हवाई सामर्थ्य वाढवण्यासाठी पाकिस्तान मित्र देशाकडून सहकार्य मागत सुटला आहे. ज्यामध्ये चीनचा देखील समावेश आहे.



चीनकडून लष्करी सहकार्याची मागणी

पाकिस्तान आता आपले हवाई दल मजबूत करण्यासाठी चीनकडून मदत घेऊ पाहत आहे. त्याने चीनकडून आधुनिक रडार सिस्टीम केजे-५०० खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ज्याद्वारे भारताकडे नजर ठेवणे त्यांना शक्य होईल.

केजे-५०० म्हणजे काय?

केजे-५०० ही एक एईडब्ल्यू अँड सी म्हणजेच एअरबोर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टीम आहे, जी हवाई देखरेख आणि नियंत्रणासाठी वापरली जाते. ती शत्रूच्या हालचाली आगाऊ शोधू शकते. ४७० किमी पर्यंत पाळत ठेवण्याची क्षमता केजे-५०० हे सुमारे ४७० किमी पर्यंत शत्रूच्या लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा मागोवा घेण्यास सक्षम आहे. यामुळे पाकिस्तानला आकाशावर चांगले नियंत्रण मिळेल. एकाच वेळी ६० लक्ष्यांचा मागोवा घेण्याची शक्ती ही रडार प्रणाली एकाच वेळी ६० हून अधिक लक्ष्यांचा मागोवा घेऊ शकते आणि रिअल टाइममध्ये लढाऊ विमानांना कमांड देऊ शकते.

चीन आधीपासून या रडारचा वापर करत आहे

चीनची पीपल्स लिबरेशन आर्मी एअर फोर्स (पीएलएएएफ) आधीच या रडार प्रणालीचा वापर करत आहे, विशेषतः तैवान आणि दक्षिण चीन समुद्र क्षेत्रात याचा वापर केला जात आहे.

केजे-५०० पाकिस्तानला हवाई क्षेत्रात आघाडी देऊ शकते, ज्यामुळे भारतीय हवाई संरक्षण अधिक सतर्क राहावे लागेल. त्याची तैनाती संवेदनशील असेल, विशेषतः सीमावर्ती भागात. पाकिस्तानची आर्थिक स्थिती अजूनही असहाय्य आहे. अर केजे-५०० ची किंमत लाखो डॉलर्सची आहे. पाकिस्तानची ढासळणारी अर्थव्यवस्था आणि कर्जाचा वाढत चाललेला बोजवारा असूनही, पाकड्या आपल्या संरक्षण सौद्यांवर मोठा खर्च करत आहे.

# सर्व प्रतिज्ञापत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफ

## महसूलमंत्री बावनकुळे यांची घोषणा

मुंबई : सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत शुक्रवारी केली. आता पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरऐवजी साध्या कागदावर अर्ज करून विविध प्रमाणपत्रे मिळणार आहेत. त्यामुळे विशेषतः विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. जातपडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र यासह शासकीय कार्यालयांत दाखल कराव्या लागणार्या सर्वप्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अशी प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र द्यावे लागत होते. आता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्रे मिळू शकणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा खर्च वाचणार आहे.

दहावी, बारावीच्या परीक्षांचा निकाल लागतो, तेव्हा सर्व विद्यार्थी व पालकांची प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी धांदल सुरू होते. केवळ शैक्षणिकच नाही, तर इतर अनेक कारणांसाठीही दाखले लागतात.

महसूलवाढीसाठी अशा दाखल्यांसाठीचे मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरून ५०० रुपये करण्याचा निर्णय नव्या सरकारने घेतला होता. या निर्णयाचा सर्वाधिक फटका हा विद्यार्थ्यांना बसणार असल्याने हा निर्णय मागे घेत सर्वप्रकारचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय बावनकुळे यांनी जाहीर केला होता. आता या निर्णयाची माहिती त्यांनी निवेदनाद्वारे सभागृहात दिल्याने या निर्णयाची अंमलबजावणी लगेचच होणार आहे.

विद्यार्थी, पालकांकडून स्वागत

महसूलमंत्री बावनकुळे यांनी, प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आल्याची घोषणा केल्यानंतर प्रामुख्याने विद्यार्थी आणि पालकांनी या घोषणेचे जोरदार स्वागत केले आहे. यामुळे आता साध्या कागदावर अर्ज करून आम्हाला आवश्यक दाखले मिळवता येतील, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# जळगाव बस अपघाताप्रकरणी आ. जावळे संतापले, अधिकाऱ्यांना दिला दम

जळगाव: भुसावळ रस्त्यावर आज सकाळी एक भीषण अपघात घडला. इंदूरहून जळगावकडे जाणारी श्री गणेश लक्झरी खासगी बस आमोदा गावाजवळ एका पुलावरून थेट मोर नदीच्या पात्रात कोसळली. या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, २५ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच रावेरचे आमदार अमोल जावळे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अपघातग्रस्त बसची पाहणी करून जखमी प्रवाशांची विचारपूस केली. यावेळी त्यांनी रस्त्यावरील खड्ड्यांच्या मुद्द्यावरून आणि अपघातांच्या वाढत्या संख्येवरून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (झथऊ) अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

आक्रमक झालेले आमदार जावळे

आमदार अमोल जावळे आज चांगलेच आक्रमक झालेले दिसून आले. गेल्या महिन्यात याच रस्त्यावर २५ अपघातांच्या घटना घडल्या असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे त्यांनी हा प्रश्न अत्यंत गांभीर्याने घेतला.

त्यांनी सावदा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता विश्वानंद तायडे यांना घटनास्थळी बोलावून, या ठिकाणी वारंवार अपघात का होत आहेत, याची सविस्तर माहिती घेतली. रस्त्याच्या रचनेतील तांत्रिक त्रुटी, चुकीचे वळण, साईन बोर्ड आणि रिफ्लेक्टरची कमतरता, तसेच सुरक्षात्मक कठड्यांची आवश्यकता या सर्व बाबींचा त्यांनी आढावा घेतला.

अधिकाऱ्यांना स्पष्ट इशारा

या पार्श्वभूमीवर आमदार जावळे यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या. ज्या तांत्रिक कारणांमुळे हे अपघात घडत आहेत, त्यावर पुढील आठ दिवसांत ठोस उपाययोजना करून सुरक्षेची हमी द्यावी. अन्यथा यानंतर काही घटना घडल्यास माझ्यापेक्षा वाईट कोणी राहणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला. तुम्ही काय करतात, काय देता याच्याशी मला घेणेदेणे नाही, असेही त्यांनी सुनावले.

# दादरचा ऐतिहासिक कबूतरखाना बंद: मुंबईची एक ओळख काळाच्या पडद्याआड

मुंबई: दादर पश्चिमेचा कबुतरखाना आता कायमचा बंद होणार आहे. एकेकाळी दादरकरांसाठी पत्ता सांगताना कबुतरखाना ही एक महत्त्वाची खूण होती. आता ही खूण नसेल. आरोग्याच्या कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आला असला तरी, मुंबईच्या इतिहासाशी जोडलेली एक महत्त्वाची ओळख पुसली जात असल्याची भावना अनेकांना सतावते आहे.

अनेक वर्षे मुंबईच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेला कबुतरखाना आता अंतिम श्वास घेत आहे. कबुतरांना धान्य दिल्याने पुण्य मिळते या श्रद्धेपोटी अनेक मुंबईकर इथे येत असत. मात्र, कबुतरांची वाढती संख्या आणि त्यांच्या विष्ठेमुळे होणारे श्वसनाचे गंभीर





आजार (हायपरसेन्सिटिव्हिटी न्यूमोनाइटिस आणि अस्थमा) लक्षात घेता, महाराष्ट्र सरकारने बृहन्मुंबई महानगरपालिकेला (इचउ) मुंबईतील सर्व ५१ अधिकृत कबुतरखाने तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

याच पार्श्वभूमीवर, दादरमधील कबुतरखान्याचा एक शेवटचा हृदयस्पर्शी व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ पाहून अनेक मुंबईकर भावूक झाले आहेत. काही जण या निर्णयाचे स्वागत करत आहेत, तर काही या कबुतरांचे आता काय होणार? या चिंतेने ग्रासले आहेत.

या संदर्भात एक लक्षणीय सूचना देखील पुढे आली आहे. कबुतरखान्याच्या जागेवर कोणत्याही व्यक्तीचा फोटो लावण्याऐवजी कबुतराचे शिल्प लावावे, अशी मागणी काही मुंबईकरांनी केली आहे. यामुळे 'कबुतरखाना' ही ओळख कायम राहील आणि ती आठवण जपली जाईल, अशी त्यांची भावना आहे.

प्रशासनाने कबुतरांची वाढती संख्या आणि त्यामुळे निर्माण होणारे आरोग्यविषयक धोके लक्षात घेऊन हा निर्णय योग्य असल्याचे म्हटले आहे. दादरचा कबुतरखाना ही केवळ एक जागा नव्हती, तर मुंबईच्या अनेक आठवणी आणि भावना तिच्याशी जोडलेल्या होत्या. या ऐतिहासिक स्थळाच्या बंदमुळे मुंबईच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय आता संपणार आहे.

# एक टन गोमांसासह दोन खाटीक पैठण एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ :- पैठण एमआयडीसी पोलिसांनी पिंपळवाडी परिसरात एका ठिकाणी छापा टाकुन त्याठिकाणाहुन जवळपास एक टन गोवंश मांस जप्त केले असून याप्रकरणी दोन आरोपी खटकांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आषाढी एकादशीच्या दिवशी पैठण तालुक्यातील शहरालगत असलेल्या पिंपळवाडी पिराची येथे गोमांस विक्रीसाठी आणलेले आहे अशी गोपनीय माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पसहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांना मिळाल्यावरून सदर ठिकाणी रेड कारवाई केली असता दोन इसम आरोपी खाटीक साबेर इनूस कुरेशी वय २८ वर्ष रा.ढोरकीन, हमीद इब्राहीम कुरेशी वय ३० वर्ष. रा. ढोरकीन हे गोमांस ताब्यात बाळगताना मिळून आले.त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळ पास ९०० ते १००० किलो गोमांस दोन मोटार सायकलसह जप्त करून महाराष्ट्र पशू संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक विजयकुमार मे.राठोड अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ.सिद्धेश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी ईश्वर जगदाळे, मपोउपनि कविता जगताप, पोलीस अंमलदार राहुल मोहतमल, अंकुश राहटवाड, मिलींद घाटेश्वर, कृष्णा उगले, रामेश्वर पंडित, संतोष साळवे, सविता रगडे, जीवन गुडेकर होमगार्ड श्रीकांत त्रिभुवन, अनिल झिने,अमजद शेख, बंडू वीर, नंदू मगरे, संतोष वैष्णव आदींच्या पथकाने पार पाडली.

# प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांना रोटरी भूषण पुरस्कार जाहीर

## २५ जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार वितरण सोहळा

तभा वृत्तसेवा



अंबाजोगाई : येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांना २०२५ -२०२६ या वर्षीचा रोटरी भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण २५ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल परिचय येथे भावी प्रांतपाल जयेश पटेल यांच्या उपस्थितीत होणार आहे.अशी माहिती रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी यांनी दिली.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना रोटरी भूषण या पुरस्काराचे वितरण केले जाते.यावर्षी हा पुरस्कार अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.बी.आय.खडकभावी यांना देण्याचा निर्णय क्लबच्या बैठकीत घेण्यात आला.

अंबाजोगाई हे शिक्षणाचे माहेरघर आहे.येथे तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय उभारणीत डॉ.बी.आय.खडकभावी यांचा मोठा वाटा आहे.गेल्या ४० वर्षांपासून अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून शिक्षण क्षेत्रात त्यांची वेगळी ओळख आहे. अंबाजोगाई सारख्या ग्रामीण भागात तंत्र शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देत हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला त्यांनी नवी कलाटणी दिली.

अंबाजोगाईच्या शिक्षण क्षेत्रात जेव्हा तंत्रशिक्षणाची उणीव होती. त्याच काळात ४० वर्षापूर्वी कर्नाटकातून बी.आय.खडकभावी हे तंत्रशिक्षक म्हणून अंबाजोगाईत रुजू झाले. व अंबाजोगाईकरांच्या मनात स्थान निर्माण करून राहिले. त्यांनी आपल्या कार्य कर्तृत्वाने शिक्षण क्षेत्रात नवी ओळख

निर्माण केली. ग्रामीण भागातील ५ हजारांपेक्षा जास्त मुलींना अभियांत्रिकीचे शिक्षण देऊन खऱ्या अर्थाने ते महिला सक्षमीकरणाचे पुरस्कर्ते ठरले आहेत. अंबाजोगाईच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची ओळख त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला गुणवत्तेतून करून दिली. शिस्तप्रिय व विद्यार्थी प्रिय प्राचार्य, उत्तम प्रशासक, अशी त्यांची ख्याती आहे. खडकभावी हे बाबू सर या नावानेच अंबाजोगाईत लोकप्रिय ठरलेले आहेत.त्यांनी समाजाशी असणारी बांधिलकी कधीही तुटू दिली नाही.

अंबाजोगाईच्या शिक्षण क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने त्यांना रोटरी भूषण पुरस्कार जाहीर केला आहे.

# नाथसागराच्या दिशेने मोठा जलाऔघ; धरणाचा पाणीसाठा ५१ टक्के

पैठण दि ०६ :- मराठवाड्यातील जनतेसाठी ही आनंदाची बातमी असून अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात चांगला पाऊस होत असल्याने नाथसागर जलायशयाच्या ( जायकवाडी प्रकल्प ) दिशेने मोठा पाण्याचा जलाऔघ येत आहे. यामुळे दिनांक ६ जुलै आषाढी एकादशीच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता धरणाची पाणीपातळी ५०.५७ टक्के एवढी झाली आहे. जलाशयात १६ हजार २९६ क्युसेक प्रमाणे पाण्याची आवक होत असून येत्या २४ तासांत ही आवक मोठया प्रमाणात वाढणार आहे. यामुळे धरणाच्या पाणी साठ्यात वाढ होणार आहे.



जायकवाडी धरण क्षेत्रात पाऊस नसला तरीही वरील भागात चांगला पाऊस होत असल्याने गोदावरीवरील अनेक छोट्या-मोठ्या प्रकल्पांतील पाणीसाठाही वाढला आहे. मराठवाड्याची तहान भागवणाऱ्या जायकवाडी धरणातसुद्धा पाण्याची आवक पंधरा दिवसांपासून सुरू असून, पाणीपातळी २९ वरून रविवारी ५१ टक्क्यांवर आली आहे. नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे वरील धरणातून मोठया प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे जायकवाडी धरणात पाण्याची आवक जलदगतीने सुरू आहे. मागील तीन-चार वर्षांपासून मराठवाड्यात अतिवृष्टी होताना पाहायला मिळत आहे. त्यामुळे जायकवाडी धरणदेखील चार वर्षांपासून पूर्णपणे भरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.सध्या धरणात १ हजार ९७.७८५ दलघमी एवढा जिवंत पाणीसाठा आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पाटोदे मित्र मंडळातर्फे आ. संजय बनसोडेंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी उदगीर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उद्योजक बाळासाहेब पाटोदे व मित्र मंडळाच्या वतीने आमदार बनसोडे यांचा सपत्नीक जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी करून सत्कार करण्यात आला. शनिवारी आमदार संजय बनसोडे यांचे सपत्नीक उदगीर शहरात आगमन झाले होते. शहरातील



छत्रपती शिवाजी महाराज चौकात उद्योजक बाळासाहेब पाटोदे व मित्र मंडळाच्या वतीने आमदार संजय बनसोडे यांचे जोरदार स्वागत करून जेसीबीच्या सहाय्याने पुष्पृष्टी करून त्यांचा सत्कार करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बाळासाहेब पाटोदे, उदय मुंडकर, सतीश पाटील मानकीकर, प्रा. मदन पाटील, अजीत फुलारी, अंकुश ताटपले, युवराज कांडगिरे, बळवंत चिंचोलकर, संतोष पांढरे, बाबासाहेब कांबळे, पंकज कालानी, प्रमोद कालोजी, गोपाळ पाटील, कमलाकर फुले, श्याम मोरे, बालाजी हुरुसनाळे, ऋषी पाटील, दीपक मोरे, परमेश्वर बिरादार, दिनू बिरादार, अमोल पाटील, शिवशंकर पाटील, गिरीश पाटील, गिरीश सूर्यवंशी, गोपाळ वाडकर, प्रतीक पाटील, यशवंत बिरादार, रामदास माळेगावे, बालाजी नादरगे, राहुल अतनुरे, डी. एस. बिरादार, अनिल बिरादार, संतोष राठोड, गणेश जाधव, दिनेश पाटील, ओमकार पिंगळे आदी उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## अपघातात दोघांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
मद्यधुंद अवस्थेत कंटेनरचालकाने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने निलंगा तालुक्यातील निटूरजवळील पेट्रोल पंपाजवळ झालेल्या भीषण अपघातात एका ९ वर्षांच्या मुलासह दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या अपघातात अन्य एकजण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

तालुक्यातील बाकली येथील किरण सुभाष कांबळे हे सुधाकर कवठकर यांच्याकडे सालगडी म्हणून काम करीत होते. किरण कांबळे यांचा ९ वर्षीय मुलगा यश हा आजारी असल्याने तो निटूर येथील आरोग्यवर्धिनी येथे ॲडमिट होता. शुक्रवारी त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्याने किरण कांबळे हे आपले मालक सुधाकर कवठकर यांना दुचाकीवर सोबत घेऊन निटूरला आले होते. मुलाला घेऊन ते गावाकडे परतत असताना निटूरजवळील पेट्रोल पंपाजवळ येथे भरधाव कंटेनरने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की, दुचाकीचे दोन तुकडे तर झालेच शिवाय दुचाकीस्वार १० फूट उडून रस्त्याच्या बाजूच्या खड्ड्यात पडला. या अपघातात ९ वर्षीय यश किरण कांबळे याचा जागीच मृत्यू झाला तर गंभीर जखमी असलेले सुधाकर कवठकर हे जखमी होऊन मरण पावले.

## उदगीर शहरात दुकान फोडले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
उदगीर शहरातील हनुमान मंदिराजवळील एका पान शॉपच्या दुकानाचे लाकडी दरवाजाचे कडी कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दुकानातील बिडी- सिगारेटचे बॉक्स आणि रोख रक्कम असा एकूण पाच लाख २२ हजार सातशे रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

याबाबत फिर्यादी बालाजी रामचंद्र आंबेसंगे यांच्या शहरातील हनुमान मंदिराजवळील अथर्व पान शॉप हे दुकान आहे. बुधवार व गुरुवारच्या रात्री अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या पान शॉप च्या दुकानाच्या दरवाजाचे पटाचे लोखंडी कडी कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने एकूण पाच लाख २२ हजार सातशे रुपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे अशी तक्रार दाखल केली आहे.

## कासारशिरसीत परिसरात होतेय विकासाच्या नावाखाली वृक्षतोड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
राज्यात वृक्ष लागवडीवर शासनाकडून कोट्यावधींचा खर्च केला जात असताना विकासाच्या नावाखाली कासारशिरसी येथे मोठ्याप्रमाणात वृक्षतोड केली जात आहे. परवानगी पेक्षा अधिक वृक्षतोड प्रकरणी चौकशी करुन दोषी कारवाई करावी, अन्यथा निलंगा तहसीलसमोर ठिय्या आंदोलन करु, असा इशारा मनसेचे तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार यांनी तहसीलदारांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथे विकासाच्या नावाखाली मोठ्याप्रमाणात वृक्षतोड केली जात आहे. अनेक वर्षांपासूनची जूनी निलगिरीचे झाडे तोडली जात आहेत. ही झाडे तोडण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे का व परवानगी देण्यात आली असली तर किती झाडांची संख्या तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे. शासनाने जितके वृक्षतोडीची परवानगी दिली आहे, तितकेच झाडे तोडली गेली आहेत का त्याची सखोल चौकशी करावी आणि परवानगी पेक्षा जास्त वृक्षतोड करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निलंगा तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे निलंगा तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार यांनी निवेदनाद्वारे दिला.

## शेतीच्या बांधावरून काठीने मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
शेतीच्या सामायिक बांधावरून फिर्यादीसह एकाला काठीने मारहाण करुन दुखापत केल्याची घटना केंद्रेवाडी येथे गुरुवारी घडली. याबाबत किनगाव पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी अंगद रामराव केंद्रे (रा. केंद्रेवाडी, ता. चाकूर) यांना संतराम नारायण केंद्रे याच्यासह अन्य एकाने बांधाच्या कारणावरून काठीने मारून दुखापत केली. शिवाय, जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत किनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहमदपूर तालुक्यातील केंद्रेवाडी येथील दोघांनी संगनमत केले. त्यांनी शेतीच्या बांधाच्या कारणावरून मारहाण केली.

## नुकसानग्रस्तांना अनुदानाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
मान्सूनपूर्व अतिवृष्टी होऊन लातूर शहरातील अनेक भागांतील घरांमध्ये पाणी जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान झाले होते. २७ मे रोजीच्या अतिवृष्टीने बाधित झालेल्या पात्र लाभार्थ्यांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते शनिवारी तहसील कार्यालयात प्रातिनिधिक स्वरूपात अनुदानाचे वाटप करण्यात आले.आपत्ती कोणावरही येऊ नये, जरी दुर्दैवाने आलीच तरी आम्ही तुमची काळजी घेणारे आहोत, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

यावेळी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी खाडगाव येथील अरुणा भास्कर फावडे, आकाश जुन्नी, जलसाबाई मगर, इमरान सय्यद, दाऊद पठाण, शेषराव सावळे, हेमांगी स्वामी आणि गणेश स्वामी यांना प्रातिनिधिक स्वरूपात प्रत्येकी दहा हजार रुपयांच्या रकमेच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. तसेच तहसील कार्यालयातील उत्कृष्ट काम केलेल्या कर्मचाऱ्यांचा आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

२७ मे २०२५ रोजी अचानक अतिवृष्टी झाली होती. त्याच दिवशी सायंकाळी शहराच्या विविध भागात आमदार देशमुख यांनी भेट देऊन नुकसानीची पाहणी करून नुकसानग्रस्तांना धीर दिला होता. अतिवृष्टीने घरात पाणी शिरून नुकसान झालेल्या ५४७ कुटुंबाना मदत मंजूर झाली आहे. कागदपत्र उपलब्धतेअभावी काहीजणांची मदत प्रलंबित आहे ती लवकरच मिळणार आहे, असेही यावेळी आमदार देशमुख यांनी सांगितले.

## एकल महिलांच्या पाल्यांना शालेय साहित्याचे वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
साऊ एकल महिला समिती, चलबुर्गा येथील ग्रामीण जनता शिक्षण मंडळ व हरिभाऊ शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने येथील मीनाक्षीदेवी प्राथमिक विद्यालयातील एकल महिलांच्या पाल्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

कोरोनामुळे विधवा झालेल्या महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी साऊ एकल महिला समिती काम करते. हेरंब कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात लातूर जिल्ह्यात प्रा. दत्तात्रय सुरवसे व सविता कुलकर्णी हे काम करतात. यानिमित्त प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. माजी शिक्षणाधिकारी आर. पी. गायकवाड यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले.

अध्यक्षस्थानी हरिभाऊ शिक्षण संस्थेचे संस्थापक गोरोबा साठे होते. यावेळी डॉ. पद्मसिंह बिराजदार यांनी एकल पालक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक माहिती दिली. आर. पी. गायकवाड यांनी बदलत चाललेली शिक्षण पद्धती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांची घटणारी संख्या याविषयी माहिती दिली.

यावेळी डॉ. पद्मसिंह बिराजदार यांनी ३८ डझन रजिस्टर, भारतीय स्टेट बँकेचे सहायक व्यवस्थापक रमेश झुंजारे यांनी ३६ दप्तर, अभंग सूर्यवंशी यांनी वह्या, निवृत्त अभियंता कांबळे यांनी पेन्सिल व खोडरबर उपलब्ध करून दिले. संजय जाधव यांनी मुलांच्या खाऊसाठी १ हजार १०० रुपये दिले. यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## कारच्या अपघातात एक ठार, ५ जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
अंबाजोगाई तालुक्यातील उजनी येथील जिल्हा परिषद शाळेतील सहा वर्गमित्रांच्या कारला औसा तालुक्यातील शिंदाळा (लो.) येथे शनिवारी दुपारी १ वाजता झालेल्या भीषण अपघातात एकाचा जागीच मृत्यू तर पाचजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. सदरील वर्गमित्र तुळजापूरला तुळजाभवानीच्या दर्शनासाठी जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अंबाजोगाई तालुक्यातील सहा तरुण शनिवारी एका कारने तुळजापूरला तुळजाभवानीच्या दर्शनासाठी जात होते. औसा तुळजापूर महामार्गावर शिंदाळा (लो.) येथे दुपारी १ वाजता चालकाचा गाडीवरचा ताबा सुटून लोखंडी रॉड तोडून गाडी सर्विस रोडच्या बाजूला येऊन पडली. या भीषण अपघातात कार्तिक गायकवाड याचा जागीच मृत्यू झाला. ओमकार गिरी, शिवम गुट्टे, रोहन कांगणे, किरण कांगणे हे जखमी झाले.

## रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांची भरती सुरू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
जिल्ह्यात रिक्त असलेल्या ५५४ पोलीस पाटील पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरू झाली असून, यासाठी २४ ऑगस्ट २०२५ रोजी लेखी तर २६ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२५ दरम्यान तोंडी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यात एकूण ८६३ गाव पोलीस पाटील पदे आहेत. त्यापैकी मे २०२५ पर्यंत ५५४ पोलीस पाटील यांची पदे रिक्त आहेत. रिक्त झालेल्या या पदांवर पोलीस पाटील भरती करण्याची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाने सुरू केली आहे. त्यासाठी १ ते १० जुलै दरम्यान बिंदुनामावली तयार करण्यात येणार आहे. ११ जुलै ते २० जुलै २०२५ दरम्यान पोलीस पाटील पदांचे गावनिहाय आरक्षण घोषित केले जाणार आहे. तर १२ ऑगस्ट रोजी आलेल्या अर्जांची छाननी केली जाणार आहे. २४ ऑगस्ट रोजी या पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. २६ ऑगस्ट ते १० सप्टेंबर २०२५ या दरम्यान लेखी परीक्षेत पात्र उमेदवारांची तोंडी परीक्षा घेतली जाणार आहे. यासाठी १ ते ११ ऑगस्ट २०२५ या दरम्यान इच्छुक उमेदवारांना विहित नमुन्यात अर्ज करता येणार आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्ह्यात उद्योगधंदे व रोजगार उपलब्ध नसल्याने हजारो सुशिक्षीत बेरोजगारांच्या हाताला काम नाही. त्यामुळे बेरोजगारांची संख्या वाढत आहे.

जवळपास सर्वांनाच सरकारी नोकरीची अपेक्षा आहे. मात्र, सरकारकडून पद भरतीबाबत ठोस कारवाई करण्यात येत नाही. त्यामुळे नाईलाजाने अगदी शिपाई पदांची भरती प्रक्रिया सुरू झाली की, उच्च शिक्षित असूनही हजारो जणांचे अर्ज येतात. मात्र, जागा कमी असल्याने अनेकांची अपेक्षाभंग होते.

गाव पातळीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पाटील हे पद महत्त्वाचे आहे. त्या दृष्टिकोनातून जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील रिक्त ५५४ पोलीस पाटील पदांची भरती प्रक्रिया सुरू केली आहे. शासनाने निश्चित केलेले वेतन व शर्ती लागू राहणार आहेत. गावनिहाय पोलीस पाटील पदांचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर या पदांसाठीही अर्ज करण्यासाठी त्या-त्या गावातून इच्छुकांची गर्दी होणार आहे. तरुण वर्ग गावचा पाटील म्हणून भरती होण्याची तयारी करीत आहे.

## ‘सत्संग’तर्फे वारकऱ्यांना मोफत यात्रा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
श्री सत्संग प्रतिष्ठानच्यावतीने शनिवारी येथील मध्यवर्ती बसस्थानकातून सुमारे १५०० वारकऱ्यांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत एस.टी. सेवा उपलब्ध करून देत त्यांना निरोप देण्यात आला.

श्री सत्संग प्रतिष्ठानतर्फे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेल्या २५ वर्षांपासून वारकऱ्यांसाठी मोफत वारीचा उपक्रम राबविला जात आहे. वारकऱ्यांसाठी हरिपाठ, माळ, फराळ, पाणी बॉटल, बॅग देण्यात येतात. या उपक्रमाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. शनिवारी शहरातील मध्यवर्ती बसस्थानकातून वारकऱ्यांना मोफत बसेसच्या माध्यमातून पंढरपूरकडे रवाना करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोविंद पारीख, सचिव नंदूशेठ लड्डा, लक्ष्मीरमण लाहोटी, अशोक गोविंदपूरकर, दिलीप माने, ललीतभाई शहा, रमेश राठी, अशोक अग्रवाल, रमेश भुतडा, ‘आरसीसी’चे प्रा. शिवराज मोटेगावकर, सीए प्रकाश कासट, दत्ता लोखंडे यांच्यासह अन्य पदाधिकारी, मान्यवर आणि वारकरी उपस्थित होते.

## तोंडारच्या विलास साखर कारखान्यात मिल रोलरचे पूजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
उदगीर तालुक्यातील तोंडार येथील विलास सहकारी साखर कारखाना युनिट-२ मध्ये कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते मिल रोलर पूजन करण्यात आले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथ शिंदे, रवींद्र काळे, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संचालक अमृत जाधव, सतीश शिंदे, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, नितीन पाटील, गोवर्धन मोरे, रणजित पाटील, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, नेताजी साळुंके, दीपक बनसोडे, लताबाई देशमुख, सुभाष माने, कल्याण पाटील, ज्ञानोबा गोडभरले, मारोती पांडे, विनोबा पाटील, प्रीती भोसले यांच्यासह कारखान्याचे अधिकारी, खातेप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

कारखान्याचे संस्थापक मार्गदर्शक आमदार अमित देशमुख यांच्या सूचनेनुसार या हंगामात ७ लाख टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. चालू हंगामामध्ये कारखाना जास्तीत जास्त हार्वेस्टरच्या माध्यमातून ऊस तोडणी करणार असून, कारखान्याने २० हार्वेस्टर मशीन खरेदी केल्या आहेत. पुढील काळात ऊसतोड मजुरांअभावी ऊस तोडणी यंत्राद्वारेच ऊस तोडणी करावी लागणार आहे. त्यामुळे ऊस उत्पादकांनी आपल्या शेतातील दगडगोटे बाहेर काढून योग्य अंतराची सरी पाडून ऊस लागवड करावी, असे आवाहन कारखान्याचे कार्यकारी संचालक आत्माराम पवार यांनी ऊस उत्पादकांना केले आहे.

## हडोळतीच्या ‘त्या’ शेतकऱ्याला सहकारमंत्र्यांनी केले कर्जमुक्त



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
बैलांऐवजी कोळपणीचा जू खांद्यावर घेणाऱ्या व कोळपणी करणाऱ्या हाडोळती येथील अंबादास गोविंद पवार या दाम्पत्याकडे असलेले सोसायटीचे ४१ हजार ५०० रुपयांचे कर्ज स्वतः सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी भरून पैसे भरल्याची पावती अंबादास पवार यांच्या हडोळती येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्या हातात दिली. एवढेच नव्हे तर त्यांनी या कुटुंबाच्या इतरही समस्या सोडविण्याची हमी दिली.

यावेळी आमदार विक्रम काळे, उपविभागीय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्ज्वला पांगरकर, तालुका कृषी अधिकारी सचिन बागवे, सहायक निबंधक पालवे, गटविकास अधिकारी पंकज शेळके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मंचकराव पाटील आदी उपस्थित होते.

शेतकरी अंबादास पवार यांच्याकडे हडोळती विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे थकीत कर्ज फेडण्यासाठी सहकारमंत्री पाटील यांनी सोसायटीच्या पदाधिकारी, अधिकारी यांच्याकडे ४१ हजार ५०० रुपये सुपूर्द केले. तसेच या रकमेचा भरणा करून त्याबाबतचे प्रमाणपत्र पवार यांना सुपूर्द करण्याच्या सूचना दिल्या. राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी शासन सकारात्मक आहे. शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत, असे सहकारमंत्री पाटील म्हणाले.

## नेहमी कचरा पडणाऱ्या ठिकाणाचे सुशोभीकरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.६ जुलै -**
शहरातील प्रभाग क्रमांक १३, झोन ए मधील संविधान चौक येथे नेहमी कचरा पडलेला असायचा. त्या ठिकाणाचे सुशोभीकरण करून पालिकेच्या वतीने तेथे वाचन कट्टा सुरू करण्यात आला आहे.

आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी स्वच्छता निरीक्षकांची बैठक घेऊन शहर स्वच्छतेबाबत निर्देश दिले होते. त्यांच्या संकल्पनेतून स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.त्यानुसार उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनात स्वच्छतेसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या अंतर्गत प्रभाग क्रमांक १२ मध्ये सफाई अपनाओ, बिमारी भगाओ या अंतर्गत ए झोनमधील ७० कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम



राबवली. या अंतर्गत विलासराव देशमुख मार्ग, संविधान चौक ते पाच नंबर चौक हा पूर्ण रस्ता स्वच्छ करण्यात आला. चौधरी नगर येथील नाल्याची स्वच्छता करून जंतुनाशक फवारणी करण्यात आली. त्या परिसरातील १३ टन कचरा उचलण्यात आला.

या मोहिमेत उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे,सर्व मुख्य स्वच्छता निरीक्षक, मुन्ना पाल, चंदू साबदे यांनी सहभाग नोंदवला. मनपाचे ५ ट्रॅक्टर,बोबकेट मशीन व फवारणी मशीनचा स्वच्छतेसाठी वापर करण्यात आला.

संविधान चौकात नेहमी कचरा पडलेला असायचा. त्या ठिकाणाचे डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते सुशोभीकरण करण्यात आले. तेथे वाचन कट्टा तयार करण्यात आला. यावेळी स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे, स्वच्छता निरीक्षक धनराज गायकवाड यांची उपस्थिती होती.

शहरात नेहमी कचरा पडणाऱ्या ठिकाणांची याच पद्धतीने स्वच्छता केली जाणार आहे. नागरिकांनी आपल्या घरातील कचरा वर्गीकरण करून घंटागाड्यांना द्यावा, असे आवाहन उपायुक्त डॉ. खानसोळे यांनी यावेळी बोलताना केले.

# शहरासह जिल्ह्यात ठिकठिकाणी भरली विठ्ठल नामाची शाळा

## दिंडीतून दिला विशेष शिक्षणाचा संदेश - आरंभच्या मुलांचे विठ्ठलाला साकडे



छ. संभाजीनगर– बा विठ्ठला आम्ही तुझी विशेष मुले आहोत. आमच्यावर तुझी कृपादृष्टी कायम ठेव असे साकडे घालत आरंभ स्वमग्र आणि गतिमंद मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची दिंडी मंदिरात पोचली.

माथी चंदनाचा टीळा, गळ्यात तुळशीमाळ, हातात टाळ घेऊन वारीसाठी छोटे वारकरी तयार झाले. शाळेत विठ्ठल रखुमाईची पुजा आणि आरती करण्यात आली. मुलांनी अभंग गायले. विठ्ठल रखुमाईची प्रतिमा आणि विशेष शिक्षणासाठी वापरले जाणारे साहित्य पालखीत ठेवुन विठूनामाचा गजर करत आरंभचे छोटे छोटे वारकरी समान शिक्षणाचा संदेश देत होते. पालखीत ठेवलेल्या थेरीपिच्या विविध साहित्याकडे नागरिक कुतुहलाने पहात होते. पालखीतील विठ्ठल रखुमाईच्या प्रतिमेसह शैक्षणिक साहित्याचे दर्शन घेतले. छोट्या वारकऱ्यांचे कौतुक केले. पालखी मंदिरात पोचताच मुलांनी दर्शन घेऊन मंदिर प्रांगणात फेर धरला. फुगड्या आणि पावली खेळली. आरंभचे शिक्षक विजयश्री जाईबहार, अश्विनी वांढेकर, निलिमा वावरे, पल्लवी सोनावणे, श्वेता शिंदे यांनी ही दिंडी यशश्वी करण्यासाठी प्रयत्न केले.



छत्रपती संभाजीनगर : आषाढी एकादशीनिमित्त सातारा परिसर येथील माऊली नगर च्या वतीने दिंडी काढण्यात आली. यावेळी लहान मुलांनी वारकऱ्यांच्या वेशात सहभाग नोंदवला.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशी साजरी



बिडकीन दि ६ जुलै पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे आषाढी एकादशी निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पोशाख करून शाळेच्या आजूबाजूच्या परिसरात गावात दिंडी काढण्यात आली होती, यामध्ये शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी पावल्या , फुगड्या खेळून व विठ्ठल भक्तीपर गीत गायन करुन आनंद व्यक्त केला. यावेळी शाळेचे शिक्षकवृंद दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, शितल कुमावत, नितीन मोरे सर, वैष्णवी टकेकर, सिमा वंजारे या सर्वांची सहभाग होता

## ओप्पो इंडियाकडून रेनो१४ सिरीज लाँच

नाशिक : ओप्पो इंडियाने रेनो१४ सिरीज लाँच केली आहे, ज्यासह प्रत्येक वैशिष्ट्यामध्ये कार्यक्षमता, शक्ती आणि अचूकतेची मागणी करणाऱ्या वापरकर्त्यांसाठी परिपूर्ण स्मार्टफोन अनुभव मिळणार आहे. रेनो१४ आणि रेनो१४ प्रो सह ओप्पो वापरकर्त्यांच्या फोटो कॅप्चर, एडिट करण्याच्या, तसेच त्यांच्या जीवनाला शेअर करण्याच्या पद्धतीमध्ये बदल करत आहे. या स्मार्टफोन्समध्ये लॉसलेस ३.५एक्स ऑप्टिकल झूम + जवळपास १२०एक्स डिजिटल झूम, प्रगत एआय एडिटिंग टूल्स आणि शक्तिशाली ऑल-राऊंडरमध्ये जलरोधक टिकाऊपणा आहे, जे प्रत्येक जीवनशैलीशी जुळून जातात. यासह रेनो१४ सिरीजने सेगमेंटमधील सर्वाधिक एआय इमेजिंग व उत्पादकता वैशिष्ट्यांची भर करत मर्यादांना दूर केले आहे, ज्यामुळे रेनो१४ सिरीज पैशांचे उत्तम मूल्य देते. ग्राहक फर्स्ट सेल्स कालावधीदरम्यान निव्वळ प्रभावी किंमत म्हणून ३४,२०० रूपयांच्या** सुरूवातीच्या किमतीपासून रेनो१४ सिरीज खरेदी करू शकतात.यात आहे ३.५एक्स टेलिफोटो कॅमेरा, वायरलेस चार्जिंग, भारतातील पहिले मीडियाटेक डाइमेंशन ८४५० आणि इतर अनेक वैशिष्ट्ये. रेनो१४ सिरीजसोबत ओप्पो पैड एसई देखील लाँच करण्यात आला आहे.

## सेव्ह अर्थ मिशनचे जागतिक विझनाचे अनावरण

नाशिक– अहमदाबाद येथील गिफ्ट सिटी क्लबमध्ये आयोजित एका ऐतिहासिक आणि अभूतपूर्व कार्यक्रमात सेव्ह अर्थ मिशन - जगातील सर्वात वेगाने वाढणारी पर्यावरणीय चळवळ ने आपल्या 'ग्लोबल विझनाच्या' मोहिमेचे औपचारिक अनावरण केले. या विझनचा (दृष्टिकोनाचा)केंद्रबिंदू आहे, ऑगस्ट २०२५ पासून सुरू होणारी ६०+ देशांमध्ये एकाच वेळी राबवली जाणारी आतापर्यंतची सर्वात मोठी वृक्षारोपण मोहीम. या घोषणेची माहिती सेव्ह अर्थ मिशनच्या प्रमुख 'जागतिक विझन अनविलिंग' कार्यक्रमादरम्यान देण्यात आली, जिथे जागतिक हवामान नेते, सरकारी प्रतिनिधी, विद्यार्थी, नवप्रवर्तक आणि पर्यावरणवादी एकत्र जमले. या बहुराष्ट्रीय मोहिमेचा उद्देश आहे कोट्यवधी लोकांना तातडीच्या हवामान कृतीसाठी एकत्र आणणे, झाडे लावणे, पर्यावरणीय परिसंस्था पुनर्जनन करणे आणि नेट झिरो भविष्यासाठी पाया घालणे.

## डॉल्बी सिनेमाचे पदार्पण

नाशिक : डॉल्बी लॅबोरेटरीज, इन्क. (एनवायएसई: डीएलबी) या सर्वोत्तम मनोरंजन अनुभव देणाऱ्या जागतिक अग्रणी कंपनीने आज सिटी प्राइड, खराडी, पुणे येथे भारतातील पहिले डॉल्बी सिनेमाएँ लाँच करत ऐतिहासिक क्षण रचला.हे अत्याधुनिक ऑडिटोरियम ३१०-आसनी डॉल्बी सिनेमा आहे, जे प्रीमियम चित्रपट पाहण्याचा अनुभव देण्यासाठी उद्देशसहित डिझाइन करण्यात आले आहे, ज्यामध्ये डॉल्बी व्हिजनएँ चे उल्लेखनीय व्हिज्युअल्स आणि डॉल्बी ॲटमॉसएँ च्या सर्वोत्तम साऊंडचे संयोजन आहे. फक्त डॉल्बी सिनेमाकडे डॉल्बी व्हिजन ड्युअल ४के लेझर प्रोजेक्शन सिस्टमचा दोन्ही दर्जा आहे, जी ब्राइटनेस, सुस्पष्टता व तपशील वाढवण्यासह स्टुडिओ ग्रेड डॉल्बी ॲटमॉस आणि प्रेरणादायी डॉल्बी सिनेमा डिझाइन देते, ज्यामधून सिनेमागृहामधील प्रत्येक आसनावर वास्तविक अनुभव मिळतो. २डी व ३डी चित्रपटांची पिक्चर क्वॉलिटी व तपशील वास्तविक आहेत, ज्यामुळे सीनमधील दृश्य प्रत्यक्ष घडत आहे असे वाटते.

## 'मी बऱ्याचदा सौम्य वाद्य संगीत किंवा श्री एम यांसारख्या शांत करणाऱ्या वक्त्यांचे प्रवचन ऐकते – अनुजा साठे

छत्रपती संभाजीनगर – सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील 'चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चौहान' ही भव्य ऐतिहासिक मालिका उत्कृष्ट कथानक आणि दमदार परफॉर्मन्समुळे प्रेक्षकांना आकर्षित करत आहे. एका भावी सम्राटाच्या बालपणीचा प्रवास या मालिकेतून उलगडत आहे. त्यातून परंपरा, नेतृत्व आणि शौर्याची कहाणी प्रेक्षकांसमोर येत आहे. या मालिकेत एक महत्त्वाची भूमिका करणाऱ्या अभिनेत्री अनुजा साठेचे तिच्या उत्कृष्ट आणि प्रभावी अभिनयाबद्दल खूप कौतुक होत आहे. सेटवर आपले मन स्थिर ठेवण्यासाठी, खास करून तीव्र, उत्कट दृश्ये करताना ती काय करते हे फारसे कुणाला माहीत नाही. पडद्यावर उत्कट दृश्ये करणे आव्हानात्मक आणि दमछाक करणारे असते. अनुजासाठी प्रभावशाली कामगिरी करण्यासाठी मानसिक तयारी असणे फार महत्त्वाचे आहे. अभिनय सहज ठेवण्याकडे अनुजाचा कल असतो. सेटवर शांत, केंद्रित आणि भावनिकदृष्ट्या तयार राहण्यासाठी अनुजाने स्वतःसाठी काही तरी नेमून घेतले आहे. थकवणारी शूटिंग शेड्यूल आणि भावनिक दृष्ट्या उत्तेजित करणारी दृश्ये करण्यासाठी काही मिनिटे ध्यान करून अनुजा आपल्या दिवसाची सुरुवात करते.

## आ. भुमरे यांनी घेतले सहपरिवार नाथांचे दर्शन



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ :- आषाढी एकादशीच्या पर्वावर सहभागी होत लाखो भक्तांसह तीर्थक्षेत्र पैठणचे आमदार विलास बापू भुमरे यांनी सहपरिवार शांतीब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज समाधीचे दर्शन घेऊन तालुक्याच्या सुखसमृद्धी सह नाथसागर जलाशय तुडूंब भरू दे अशी नाथ चरणी प्रार्थना केली. यावेळी नाथवंशजांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

आषाढी एकादशी निमित्त नाथ दर्शनासाठी लाखो भाविकांची मांदियाळी नाथनगरीत भरली होती. पहाटे ४ वाजेपासून दोन्ही मंदिरात नाथवंशजांच्या हस्ते विधिवत पूजन व काकड आरती करण्यात आली. यानंतर दर्शनासाठी भाविक भक्तांची मोठी गर्दी मंदिर परिसरात उसळली. गोदावरी मोक्ष घाटावर गंगास्नान करण्यासाठी ही भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळाली. भक्तांसाठी आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या उपस्थितीत साबुदाणा खिचडी वाटप करण्यात आली. भाविकांच्या सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण शहराच्या आगमन ठिकाणी चेक पॉईंट निर्माण करण्यात आले होते. लाखो भाविकांसाह आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी सहपरिवार नाथांचे दर्शन घेऊन तालुक्याच्या सुखसमृद्धी सह नाथसागर जलाशय तुडुंब भरू दे अशी प्रार्थना केली. यावेळी नाथ संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, युवासेनेचे जिल्हाध्यक्ष तथा सरपंच किशोर चौधरी, युवा उद्योजक किशोर तावरे, नगरसेवक भूषण कावसणकर,,सरपंच आबासाहेब गिरगे, मोहन म्हस्के, राजू मापारी,संतोष बोठे,उमेश तट्टू, राजेश माणधने सह मोठया संख्येने भाविक भक्त उपस्थित होते.

## आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांची टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी मिरवणूक



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जुलै – युनिक इंग्लिश स्कूल,शेंदुर्णी येथील नर्सरी,ज्युनिअर आणि सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त पारंपरिक वेशभूषा करून भक्तिभावाने दिंडी काढली.टाळ, मृदंग,फुगड्या,अभंगगायन आणि 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल' च्या जयघोषात संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला. विद्यार्थ्यांनी पांढरे धोतर,फेटे,नथ,नऊवारी अशा पारंपरिक पोशाखात सहभागी होऊन वारीच्या वातावरणाची अनुभूती घेतली.त्यांच्या उत्साहाने पालक,शिक्षक व परिसरातील नागरिक भारावून गेले.मुख्याध्यापिका पूनम दत्तात्रय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आयोजन करण्यात आले.शिक्षक आणि इतर कर्मचारी यांनी खूप परिश्रम घेतले.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वारीचे महत्त्व समजावून सांगितले आणि भक्तीमय संस्कृतीचा वारसा जपण्याचा संदेश दिला.या छोट्या वारकऱ्यांची दिंडी सर्वांनाच मंत्रमुग्ध करणारी ठरली.

## जि.प.प्रा.शाळा रामजीनगर येथे भरली बालवारकऱ्यांची विठ्ठल नामाची शाळा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जूलै

सोयगाव केंद्रातील उपक्रमशील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे सालाबादाप्रमाणे आषाढी एकादशी निमित्ताने सोयगाव गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाने बालवारकर्याची शाळे पासून ते विठ्ठल रूख्मिणी मंदीर आमखेडा पर्यंत पायी दिंडी काढण्यात आली.शाळेतील बालवारकरी यांनी अभंग म्हणून संपूर्ण परीसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले.या वेळी रुद्र शरद पवार या विद्यार्थ्याने विठ्ठलाची तर डिंपल अनिल ठोंबरे या विद्यार्थीनीने रुख्मिणी मातेची सुंदर अशी वेशभुषा तर इतर विद्यार्थी,विद्यार्थीनीनी वारकर्याची वेशभुषा परीधान केलेली होती.जणूकाही विठ्ठल नामाची शाळा भरली,शाळा शिकतांना तहान भूक हरली या अभंगा प्रमाणे जिल्हा परीषद प्राथमिक रामजीनगर शाळेत बालवारकर्याची विठ्ठल नामांचीच शाळा भरली होती व बालवारकरी विठ्ठल नामात रंगुन गेले होते. वयावेळी अगस्तमुनी वारकरी संस्थेतील ह.भ.प.शरद महाराज पवार यांचे व त्यांच्या विद्यार्थ्याचे अनमोल सहकार्य लाभले. दिंडी मध्ये बालवारकरी यांनी सुंदर अशा फुगड्या खेळण्याचा आनंदही घेतला.यावेळी वैशाली पवार उपाध्यक्षा शालेय व्यवस्थापन समिती,सदस्या मनिषा जेठे,पालक प्रवीण जाधव,शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये आषाढी एकादशी साजरी



बिडकीन दि ६ जुलै–पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलीत ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये आषाढी एकादशी मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांच्या हस्ते विठ्ठल – रखुमाईच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन प्रतिमेचे विधिवत पुजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी संतांची वेशभुषा धारण करुन हाती भगवा झेंडा घेवुन विठुनामाच्या जयघोषात तल्लीन झाले होते. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त भाषणे व विठुरायाच्या गाण्यांवरती नृत्य सादर केले. शाळेतिल परिसरामध्ये रिंगण बनवुन फुगडी खेळुन विठुनामाचा जयघोष करत विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. शाळेतील शिक्षक ज्ञानेश्वर चव्हाण शाळेतिल इतर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या सोहळ्याची सांगता पसायदानाने करण्यात आली.

## कै.बाबुरावजी काळे शाळेची पायी दिंडी साजरी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जूलै : आज रविवार ६ जुलै रोजी असलेल्या आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर शनिवार ५ जुलै रोजी कै.बाबुरावजी काळे शाळेची पायी दिंडी उत्साहात पार पडली. सकाळी शाळेच्या प्रांगणात संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,संस्था प्रतिनिधी कमलेश काळे,शाळेचे मुख्याध्यापक प्रा.निलेश पाटील,उपमुख्याध्यापक प्रा.ज्ञानेश्वर एलिस, पर्यवेक्षक सागर घाटे,प्रा.डॉ.निलेश गावडे,प्रा.डॉ.पाडूरंग डापके,प्रा.डॉ.संतोष पडघन,प्रा.डॉ.उल्हास पाटील,प्रा.डॉ. सुभाष पाटील,प्रा.डॉ.दादासाहेब पवार,प्रा.योगेश काळे,उमेश जाधव यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे पूजन करून दिंडीला प्रारंभ झाला. शाळेच्या प्रांगणापासून ते सोयगाव बसस्थानक,छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे आमखेडा येथील विठ्ठल रुखमाई मंदिर येथे दर्शन घेण्यात आले.मंदिरावर अनेक विद्यार्थ्यांनी फुगडी सादर केली. शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा जोतीताई काळे,सचिव देविना काळे-भटकर,संचालक शिवदीप काळे, संचालिका सुनयना शिवदीप काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश यादव यांनी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## विघ्नहर्ता गणेश मंदिरातील विठ्ठल मंदिरात तरुण भारत मधिल कोर्टीकरांच्या लेखाचे विमोचन



छत्रपती संभाजीनगर – सोलापूर तरुण भारतच्या आसमंत पुरवणीत सुधीर कोर्टीकर यांनी लिहिलेल्या 'इतिहास पंढरीच्यापांडुरंगाचा' या लेखाचे विमोचन छत्रपती संभाजी नगरचे माजी उपमहापौर डॉ.प्रमोद राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर या लेखाच्या प्रति निमंत्रिताना कोर्टीकरांच्या हस्ते देण्यात आल्या.तसेच या लेखाच्या प्रति सिडकोच्या संकट विमोचन हनुमान मंदीरात देखील वाचकांच्या वाचनासाठी लावण्यात आलेल्या आहेत. त्यांनंतर हा लेख सर्व भक्त गणांना वाचता यावा म्हणून मंदिरात लावण्यात आला.त्याप्रसंगी उद्योगपती विनोद भाले , सौ.रेखा भाले तसेच उद्योजक शिवाजी शिंदे , मुकुंद बोकील , उमेश भालेराव , सौ.नयन कोर्टीकर , मंदिराचे पुजारी पांडुरंग जोशी गुरुजी यांची प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.त्याच बरोबर सिडको परिसरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमात होती.

## मोटरसायकल वरून देशी दारूची वाहतूक; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

दि ६ फर्दापूर – पोलिसांनी मोटारसायकलवरून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या दोन आरोपीसह एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला.दोन्ही आरोपीवर फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फर्दापूर-सोयगाव मार्गावर शनिवारी (दि.५) सायंकाळी ७:३० वाजेच्या सुमारास जंगला तांडा गावाजवळ फर्दापूर पोलीस गस्त घालत असताना त्यांना बजाज कंपनीच्या मोटारसायकल क्र.एम एच १९ बीए ५४८४ वरून दोन संशयित व्यक्ती फर्दापूरच्या दिशेने जातांना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवून विचारपूस केली असता त्यांच्याकडे बेकायदेशीररित्या दोन देशी दारू असलेले बॉक्स आढळून आले.आरोपीसह मुद्देमाल ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन मध्ये जमा करण्यात आला.यामध्ये सखु संत्रा कंपनीच्या ३५ रुपये किमतीच्या २०० बाटल्या ज्याची किंमत ७ हजार व २० हजार किमतीची बजाज कंपनीची डिस्कवर दुचाकी असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पो.कॉ.संतोष उबाळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी नाथप्रसाद शंकर इंगळे (वय.२५ रा.दयाळ नगर सोयगाव) व आनंदा भगवान ठाकरे (वय.२५ रा.आमखेडा ता.सोयगाव) विरोधात फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.निलेश लोखंडे,जगदीश सोनवणे हे करीत आहेत.



## शांती आणि सुख प्राप्तीसाठी सिद्धचक्र विधानाचे आयोजन

छत्रपती सभाजीनगर (प्रतिनिधी) – १००८ मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर , १०८ उपाध्याय विरंजन सागर जी महाराज ससंघ सानिध्या मध्ये आठ दिवसीय श्री श्री सिद्धचक्र महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले सुरुवात आजपासून ३ जुलै २०२५ रोजी झाली सकाळच्या सत्रात भगवंताचे अभिषेक, पूजन , धर्म ध्वजारोहण, तदनंतर विधानासाठी सौधर्म इंद्र, कुबेर इंद्र, यज्ञ नायक आणि इतर इंद्रांचे निवड झाली यामध्ये इंद्राचा मान सौ. शीला झुंबरलालजी. रावका परिवार , सौ रिचा विनीत लोहाडे, सो मोहिनी अजित पाटणी , सौ वैशाली नितीन छाबडा व सौ सुषमा रमणलाल पाटणी यांना इंद्र आणि इंद्रायणी बनण्याचा मान मिळाला व धर्म ध्वजारोहण करण्याचा मान सौ. प्रिया राहुल शहा परिवार तसेच मंडप उदघाटन सौ ज्योती धरमचंदजी पहाडे यांना मिळाला यावेस शांती आणि सुख प्राप्तीसाठी सिद्धचक्र विधानाचे आयोजन केले आहे असे उपाध्याय विरंजन सागर जी महाराज यानी विधाना प्रंसगी ऊदगारले विधानाच्या यशस्वीतेसाठी समस्त देशमुख नगर आणि संभाजीनगर दिगंबर जैन समाज परिश्रम घेत आहेत



## जि.प.च्या शाळाच गुणकारी ठरतात त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण द्या – सपोनि पंकज बारवाल

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ जुलै

विद्यार्थ्यांवर संस्कारक्षम वातावरण तयार करण्यासाठी जिल्हा परीषदेच्या शाळाच गुणकारी ठरतात त्यामुळे पालकांनी आपल्या मुलांना जिल्हा परिषदेच्या शिक्षण द्या असे आवाहन सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी गुरुवारी तिडका येथे केले. तिडका,घोसला येथे गुरुवारी चांदमल अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट व सोयगाव तालुका मराठा प्रतिष्ठानच्या वतीने घोसला,तिडका येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील ५०० विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले.यावेळी पंकज बारवाल यांनी मुलांना जिल्हा परिषदेच्या शाळेतील मराठी शाळेतील शिक्षण द्या जिल्ह्यात जरंडी ची शाळा अव्वल आहे.या शाळेचा आदर्श घ्या असे आवाहन केले.यावेळी उपेंद्र कुलकर्णी,(दिन दयाळ शोध संस्थान दिल्ली),मनीष अग्रवाल,मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान गव्हांडे-पाटील,ज्ञानेश्वर युवरे,सरपंच गणेश माळी आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांच्या हस्ते पाचशे विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले.दरम्यान तिडका व घोसला येथील शाळेत हे कार्यक्रम झाले सोपान गव्हांडे-पाटील यांनी प्रास्ताविक केले.तिडका येथील कार्यक्रमात गुलजार तडवी सरपंच तिडका,उत्तम मोरे,सुलताना पठाण,नईम शेख,शंकर जाधव,तिडका शाळेचे मुख्याध्यापक एन.आर.मोरे,एस.आर.चौधरी,पी.ए.जैस्वाल आदि उपस्थित होते.घोसला येथे मुख्याध्यापक विजय राजपूत,सुनील महालपुरे आदींची उपस्थिती होती.मराठा प्रतिष्ठानचे ज्ञानेश्वर युवरे,सरपंच गणेश माळी,गणेश तायडे,भैय्या युवरे,ज्ञानेश्वर गवळी,अमोल बोरसे,गणेश गवळी आदिंनी पुढाकार घेतला होता.

## रोखठोक

# कसे भिडावे आव्हानाला...

**दिनेश गुणे**

मुंबईसारख्या महानगराचा दिवस घाम गाळून, कष्ट करून पोट भरणाऱ्यांचा असतो, तर रात्र मात्र, अनेकदा अंधारातील उद्योगांत बुडालेली असते. शहराच्या कोणत्या कोपऱ्यात काय सुरू असेल या भीतीने सामान्य माणसे, सातच्या आत घरात जाणे पसंत करतात आणि त्यासाठी जिवाची बाजी लावून उपनगरी रेल्वेगाड्यांच्या गर्दीत स्वतःस झोकून देतात. मुंबईची रात्र हे सामान्यांसाठी एक अनाकलनीय गूढ आहे, पण ते आजकाल केवळ एकट्या मुंबईपुरते राहिलेले नाही. या गूढाच्या गडद सावल्या राज्याच्या अन्य शहरांत आणि मुंबईच्या कुशीतील आसपासच्या शहरांतही पसरल्या आहेत. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात या अनाकलनीय गूढाचे काही धक्कादायक धागेदोरे सभागृहात उघड झाले आणि गेल्या अनेक वर्षांपासून असंख्य कुटुंबे ज्या भीतीने धास्तावली आहेत, त्या भीतीला सभागृहातच वाचा फुटली. मुंबईशेजारची मीरा भाईंदर ही स्वतंत्र महापालिका असली, तरी मुंबईशी तिचे नाते उपनगराएवढे जवळचे आहे. कारण या महापालिकेच्या परिसरात राहणारा बहुसंख्य नोकरदार वर्ग रोजीरोटीसाठी मुंबई गाठतो आणि काम संपवून शिणल्यावर निवाऱ्यापुरता इथले घर गाठतो. वर्षानुवर्षे जगण्याच्या या संघर्षात, आसपास काय चालले आहे, याचा विचार करावयासही त्याला वेळ नाही. म्हणून तो सहनशीलही झाला आहे. अनपेक्षितपणे कोसळणारे कोणतेही संकट झेलताना, तो प्रसंगी जिवावर उदारही होतो आणि संकटाचे सावट टळले की पुन्हा नव्या जगण्याच्या संघर्षासाठी सज्ज होतो. या त्याच्या सहनशीलतेला मुंबई स्पिरीट असे गोंडस नाव मिळालेले असल्याने आपल्या या संघर्षालाच शौर्य समजून तो झगडतच असतो. म्हणूनच, त्याला आपल्या जगण्याच्या चाकोरीपलीकडचे पाहायलादेखील वेळ नसावा. कदाचित यामुळेच, अंधारातील उद्योगांना मोकळे रान मिळत असावे. मीरा भाईंदरमध्ये नया नगर नावाचा एक परिसर दोन महिन्यांपूर्वी नव्याने एका वेगळ्या चर्चेत आला. या परिसरातील पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका हवालदाराने लातूर जिल्ह्यातील त्याच्या गावाकडच्या शेतात एमडी नावाच्या अमली पदार्थाचा कारखानाच सुरू केला होता. हा धंदा चालविण्यासाठी वैद्यकीय रजा घेऊन तो गावाला जात असल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. त्या कारखान्यातील सुमारे १६ कोटी रुपये किमतीचा एमडी नावाचा अमली पदार्थ व अन्य साहित्य जप्त करून त्याला पोलिस सेवेतून बडतर्फ करण्यात आले. लातूरच्या शेतातील कारखान्यात तयार होणारा हा अमली पदार्थ मुंबई परिसरात विकला जात होता, हे उघड झाले आणि विधिमंडळातील या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्रातील अमली पदार्थांच्या धंद्याचे अन्य काही काळेबेरेही समोर आले. गेल्या एकाच वर्षात अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरुद्ध १९ हजारांहून अधिक गुन्हे दाखल झाले असून सुमारे १७ हजार व्यक्तींना अटक करण्यात आली, तर तब्बल चार हजार ३४० कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

याच चर्चेदरम्यान खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेच्या सभागृहात दिलेली माहिती आणखी धक्कादायक आहे. थायलंड आणि अमेरिकेत कायदेशीर मान्यता असलेल्या हायड्रो गांजाची मोठी आयात कुरियर किंवा पोस्टाच्या माध्यमातून महाराष्ट्रात आणि देशातही होत असून या गांजाच्या विळख्यात तरुणाई बरबाद होत असल्याचे अस्वस्थ वास्तव उघड झाले आहे. माणुसकीलाच वेठीस धरून या गांजाची तस्करी सुरू आहे. शेवटच्या घटका मोजणाऱ्या कर्करुग्णांनाच या गांजाच्या तस्करीसाठी वापरले जाते आणि टपाल खाते, पोलिस दल व कस्टमचे कर्मचारी या धंद्यात सहभागी असल्याची धक्कादायक माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. मेफेड्रोनसारख्या अमली पदार्थांच्या विळख्यात गुरफटलेल्या तरुणाईला या नव्या नशेनेही विळखा घातला आहे आणि काही नशा तर प्रतिष्ठेच्या पार्टीचा अविभाज्य भाग बनल्या आहेत.

सुमारे चार वर्षांपूर्वी, उभा देश ज्या दिवशी महात्मा गांधींच्या स्मृती जागवत होता, त्याच दिवशी मुंबईजवळच्या समुद्रात धनदांडग्या बेमुर्वतखोरांची पोरे रेव्ह पार्टीत नशेबाजीचा धुमाकूळ घालून गांधीजींची मूल्ये बेदिक्कत पायाखाली तुडवत होती. बॉलिवूडच्या एका सेलिब्रिटी कलाकाराचा मुलगा एवढ्या एकाच कर्तबगारीचा मुकुट ल्यालेला एक सुपुत्र या पार्टीचा हिरो होता आणि त्याच्याभोवती सारी पार्टी पिंगा घालत होती, हे त्याच्यातर्फे करण्यात आलेल्या बचावातूनच स्पष्ट झाले होते. आपण विशेष निमंत्रित म्हणून या पार्टीत हजेरी लावली असे अभिमानाने नमूद करण्याएवढे वलय एखाद्या लाजिरवाण्या गुन्ह्याच्या तपासाभोवती निर्माण करण्याच्या त्या प्रयत्नामुळे, नव्या पिढीकडून देशाने काय अपेक्षा ठेवाव्यात आणि भरकटलेल्या भविष्याला रुळावर आणण्यासाठी काय केले पाहिजे, यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. नशेबाजी किंवा अमली पदार्थांचे सेवन हे भावी पिढीच्या भविष्यावरील भयंकर सावट आहेच, पण अमली पदार्थांचा वाढता व्यापार आणि त्याविरोधातील यंत्रणांच्या हातावर तुरी देत जागोजागी तयार होत असलेले छुपे अड्डे हादेखील एक चिंतेचा विषय आहे. या अवैध धंद्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेस आणि अंतर्गत सुरक्षिततेसही धोका असतो, हे एव्हाना स्पष्ट झाले असल्याने, केवळ पोराटोरांच्या पार्टीचा एक तमाशा एवढ्या एकाच नजरेने एखाद्या घटनेकडे पाहणे योग्य ठरलेच नसते. कारण, अशा व्यापारातून किंवा धंद्यातून होऊ घातलेला एका पिढीच्या भविष्याचा सत्यानाश स्पष्ट असतानाच, अर्थव्यवस्थेस आव्हान देणारी काळ्या धनाच्या एका समांतर अर्थव्यवस्थेतून देश पोखरण्याचा मोठा कट यातून आखला जात असल्याच्या शंकेसही बळकटी मिळत असते. देशातील



एका पिढीचे भवितव्य बरबाद करून या धंद्याच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पैसा परदेशात गोळा करण्याची एक अभद्र यंत्रणा यामागे कार्यरत असण्याची शंकादेखील व्यक्त होत असते. देशातील जनतेने कष्टाच्या घामाने पैसा मिळवावा आणि असंख्य कुटुंबांतील उगवत्या पिढ्यांना या व्यसनांच्या विळख्यात ओढून तो पैसा या धंद्याच्या माध्यमातून शोषून घ्यावा हा भविष्याच्या चिंतेचा विषय खचीतच ठरणार आहे. त्यामुळे अशा अवैध धंद्यांभोवतीचा पाश या त्याहूनही अधिक जागरूकपणे आवळला गेला पाहिजे. गांधीजींच्या जयंतीदिनी देशात घडलेल्या एका काळ्या घटनेची नोंद करणाऱ्या या नशेबाजांच्या पार्टीने तेव्हाच ही गरज अधिक अधोरेखित केली होती.

अमली पदार्थांच्या नशेचा तरुण पिढीवरील विळखा हा आजची समस्या नाही. देशातील हजारो कुटुंबांतील नवी पिढी या व्यसनांच्या आहारी जाऊन अंधाराच्या गर्तेत चाचपडू लागली आहे. धनिकांच्या जगात अशा व्यसनांना प्रतिष्ठेने मिरविले जात असल्याने उच्चभ्रूंच्या पार्ट्यांमधील अमली पदार्थांचे सेवन हा अधूनमधून चर्चेचा विषय होत असला, तरी सामान्य कुटुंबांतील तरुणाईला पडणारा विळखा हा केवळ चर्चेचा नव्हे, तर गंभीर चिंतेचा विषय असतो. गेल्या काही वर्षांत या नशेच्या आहारी जाणाऱ्यांची संख्या वाढतच चालली असल्याचे, जागोजागी उभ्या असलेल्या नशामुक्ती केंद्रांतील गर्दीवरून स्पष्ट दिसते. या समस्येला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने मागे केव्हातरी नशामुक्त भारत नावाची एक मोहीम सुरू केली, तेव्हा या व्यसनांच्या विळख्याने देशाचा केवढा मोठा भाग व्यापला आहे, तेदेखील उघड झाले होते. देशातील तब्बल पावणेतीनशे जिल्ह्यांत अमली पदार्थांचा व्यापार होत असून, या त्याच्या आहारी जाणाऱ्या तरुणाईची संख्या वाढत असल्याचे केंद्र सरकारच्या एका पाहणीतच स्पष्ट झाले होते. नशेच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांना त्यातून सोडविण्यासाठी आठ हजार स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली होती आणि या कार्यकर्त्यांनी या जिल्ह्यांतील तब्बल ८० लाख स्त्री-पुरुष आणि तरुणांवरील या समस्येचे गारुड उतरविण्यासाठी धडपड केली होती. नशेच्या विळख्यातून सोडविण्यासाठी या जिल्ह्यांत जवळपास ४०० नशामुक्ती केंद्रांतून उपचार आणि मानसोपचारांची सोय करण्यात आली. देशभरातील १८ ते ७५ वयोगटांतील १७ टक्के जनता दारूचे सेवन करते, जवळपास तीन टक्के लोक भांगेच्या नशेत बुडवून घेतात, दोन कोटी लोकांना अफूची चटक लागलेली आहे, तर एक कोटींहून अधिक व्यक्ती नशा करण्यासाठी औषधांचाही वापर करतात असे उघडकीस आले आहे. जवळपास पन्नास लाख व्यक्ती नशीले पदार्थ हुंगून आपली व्यसने भागवितात, तर जवळपास दहा लाखांना कोकेनचा विळखा पडला आहे. याच पाहणीचा आणखी एक निष्कर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने चिंताजनक आहे. या कोकेन नशाबाजांपैकी जवळपास निम्मे नशेबाज एकट्या महाराष्ट्रात आहेत, असे केंद्र सरकारच्या एका अधिकृत आकडेवारीवरून उघड झाले होते. उत्तेजक औषधांचे सेवन करणाऱ्या सुमारे १५ लाखांपैकी सुमारे साडेचार लाख लोक महाराष्ट्रात आहेत. अर्थात ही अधिकृत आकडेवारी असली, तरी अनधिकृतांचा आणि छुप्या नशेबाजांचा आकडा याहून कितीतरी अधिक असण्याची शक्यता आहे.

तीन वर्षांपूर्वी, स्वातंत्र्यदिनाच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे, अमृतकाळाच्या मुहूर्तावरच, अशाच एका, समाजाला पोखरून दुर्बल करणाऱ्या आणि पिढ्यांचे भविष्य बरबाद करणाऱ्या समस्येपासून स्वातंत्र्य मिळविण्याची गरज दुसऱ्यांदा अधोरेखित झाली. आधीच्या वर्षी गांधी जयंती साजरी होत असताना पहिला धक्का बसला, हा दुसरा धक्का १६ ऑगस्ट २०२२ रोजी, स्वातंत्र्यदिनाच्या दुसऱ्या दिवशी बसला. मुंबईच्या पोलिस दलाने तब्बल चौदाशे कोटींच्या अमली पदार्थांचा साठा जप्त केला आणि अमली पदार्थांनी तरुणाईभोवती घातलेल्या घातक विळख्यापासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढाई तीव्र करावी लागेल, याची जाणीव समाजास झाली. स्वातंत्र्यदिनाच्या दुसऱ्या दिवशी मुंबई पोलिसांनी हस्तगत केलेल्या चौदाशे कोटींच्या मेफेड्रोन (एमडी) या अमली पदार्थाच्या व्यापाराचे धागेदोरे उजेडात येऊ लागले. याआधीही, गेल्या वर्षभरात गुजरातच्या बंदरांवरून महसूल गुप्तचर खात्याने केलेल्या आठ कारवायांमध्ये हजारो कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. नौदलाच्या एका कारवाईत कोची बंदराजवळ तीन हजार कोटींचा साठा हस्तगत करण्यात आला. कोरोनाकाळात अमली पदार्थांचे सेवन आणि अवैध व्यापारात तिप्पट वाढ झाल्याची नोंद आहे. सन २०१९ ते २०२१ या तीन वर्षांत महाराष्ट्रात सुमारे दोनशे गुन्हे दाखल झाले, साडेतीनशेहून अधिक आरोपींना अटक करण्यात आली आणि त्यापैकी एका आरोपीवर गुन्हा सिद्ध होऊन त्याला शिक्षा ठोठावली गेली. २०२१ या एकाच वर्षात १०७ गुन्हे नोंदविले गेले, २१३ जणांना अटक झाली. गेल्या काही वर्षांत अमली पदार्थांचा व्यापार, मानवी तस्करीसारख्या समस्यांनी अनेक कुटुंबांच्या स्वातंत्र्याच्या आनंदावर काजळी धरली आहे. कित्येक कुटुंबे अक्षरशः उद्ध्वस्त झाली आहेत आणि कित्येकांचे भविष्य टांगणीला लागले आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वी, १५ डिसेंबर २०१४ या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांसमोर एक घोषणा केली. त्याआधीही या समस्येवर देशभर चिंता व्यक्त होत होतीच, संसदेपासून स्थानिक स्वराज्य संस्थांपर्यंत सर्वत्र या चिंतेचे पडसादही उमटत होते. पण चिंतेचे मूळ नष्ट करणाऱ्या ठोस कृतीमध्ये बहुधा काही कमतरता राहात होती आणि अनेक घरे या समस्येपायी उद्ध्वस्त होत होती. देशाच्या भवितव्याचे शिल्पकार म्हणून ज्या तरुणाईकडे आशेने पाहिले जाते, त्यापैकीच अनेक जण या समस्येचे बळी होत गेले आणि मानगुटीवर स्वार होणाऱ्या या समस्येने असंख्य कुटुंबांचे, कित्येक घरांचे स्वास्थ्य संपवून टाकले. पंतप्रधानांनी देशवासीयांना उद्देशून केलेल्या आपल्या त्या भाषणात या समस्येचा गांभीर्याने उल्लेख केला आणि या समस्येविरुद्ध तीव्र लढा उभारण्याची प्रतिज्ञादेखील केली. दोन वर्षांपूर्वी, १७ जुलै या एकाच दिवशी सुमारे दीड लाख किलो वजनाचे आणि दोन हजार ३७८ कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ देशाच्या विविध भागांत केंद्रीय गृहमंत्र्यांच्या साक्षीने नष्ट करण्यात आले. त्या केवळ एकाच वर्षात १२ हजार कोटी रुपयांचे दहा लाख किलो अमली पदार्थ नष्ट केल्याची नोंद झाली आणि त्याहून अधिक कठोर कारवायांकडे देशाचे लक्ष लागले. या धंद्यातून निर्माण होणाऱ्या काळ्या पैशाच्या साऱ्या वाटा केवळ विध्वंसक कारवायांकडेच वळत असल्याच्या भीतीने सामान्य समाज कधीपासूनच धास्तावला आहे. अगोदरच, असुरक्षिततेचे सावट सोबत घेऊन असंख्य संकटे सतत आसपास घोंघावत असतात. एक दिवस संपला की सुटकेचा निःश्वास टाकून शांतताप्रिय समाज नव्या दिवसाच्या आव्हानास सामोरे जाण्याची मानसिक तयारी करत असतो. अशा अस्थिर जगण्याला सुरक्षिततेची ग्वाही देणारे काही आसपास घडले की साहजिकच समाजाला मोठा मानसिक आधार मिळतो आणि मानसिकदृष्ट्या स्वस्थ असलेल्या समाजात शांतता प्रस्थापित होते. अस्वस्थ, संतप्त किंवा असुरक्षित समाजामुळे सार्वजनिक स्वास्थ्य संपते आणि अस्थिरता निर्माण होते. अमली पदार्थांपासून स्वातंत्र्य मिळविण्याचा हा लढा सोपा नाही. त्या समस्येच्या बुरख्याआडून अनेक शत्रूंनी देशातील एका पिढीच्या स्वातंत्र्यास आव्हान दिले आहे. ही समस्या देशाच्या भौगोलिक सीमांपुरती मर्यादितही नाही. या समस्येने आतरराष्ट्रीय सीमा ओलांडल्या असून, भारताच्या नव्या पिढ्यांना बरबाद करण्याचे आणि भारतातील पैसा परदेशांत पळविण्याचे एक आंतरराष्ट्रीय षडयंत्रदेखील अधोरेखित झाले आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### प्रबळ इच्छाशक्ती

**मुंगी उडाली आकाशी ।**
**तिने गिळिले सुर्यासी ॥**

आषाढ महिना आला . आषाढी एकादशीची ओढ सर्व भक्तांना लागली . कधी त्या पंढरीच्या विठुरायाला पाहतो, असं सर्वांना झालं. पंढरीला जाणाऱ्या दिंड्या सजल्या. लहान थोर सर्व भक्त मंडळी दिंड्यांमध्ये एकत्र सामील झाली . ही सर्व वारकरी मंडळी मृदंग, टाळ, तुळशी वृंदावन, वगैरे घेऊन दिंड्यांमध्ये सामील होऊन पंढरीला जायला निघाली. इकडे एक मुंगी तीही विठ्ठलाची भक्त. तिनेही पंढरीला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घ्यायचे ठरविले. मुंगीने आपली प्रबळ इच्छा आईला बोलून दाखवली. पण मुंगीची आई व बाबा घरचे लोक परवानगी काही देईनात. मुंगीची आई मुंगीला म्हणाली,



बाळ तू खूप छोटी आहेस, तुझे पाय छोटे व पंढरी खूप दूर आहे, शिवाय रस्ताही तुला माहीत नाही. कसं जाणं होणार तुझं? परंतु पंढरीला जाऊन पांडुरंगाचे दर्शन करणारच हा मुंगीचा निर्धार पक्का होता. छोटी मुंगी तिच्या आईला म्हणाली, अगं आई! माझा विठुराया मला बरोबर नेईल पंढरपूरला. तू काहीही काळजी करू नको. तो माझा विठुराया काळजी करेल माझी. मुंगीने आईकडून महत्प्रयासाने परवानगी घेतली. आणि विठुरायाच्या दर्शनाला एकटीच पंढरीला जायला निघाली. पण ..

काही दूर अंतरावरच मुंगी चालून पूर्ण थकून गेली. तिथे जवळच तुळशीचे मोठ्ठे बन होते. त्या तुळशीच्या झाडावरच्या पानावर दोन मिनिटे विश्रांती घ्यावी, अन् आराम झाला की पुढे निघू म्हणून मुंगीने थकलेले शरीर त्या तुळशीच्या पानांवर टेकवले. काही वेळाने मुंगीला खूप गाढ झोप लागली. इकडे वारकऱ्यांची दिंडी आली व तीही दिंडी पंढरपूरला जाता जाता तिथेच त्या तुळशीच्या बनापाशी विश्रांतीसाठी थांबली. दिंडीतल्या लोकांनी तिथे भरपूर तुळशीची पाने तोडून विठुरायासाठी तुळशीमाळा तयार केली आणि ताबडतोब दिंडी पुन्हा पंढरीला जायला निघाली. काही दिवसानी दिंडी पंढरपूरला पोहचली. इकडे ज्यावेळस मुंगीला जाग आली, त्यावेळेस तिला असे वाटले की ती घनदाट जंगलामध्ये एकटीच आहे . हे पाहून मुंगी खूप घाबरली आणि पुन्हा तुळशीच्या दाट झाडीत लपली. गंमत अशी की, मुंगी ज्या तुळशीच्या झाडीमध्ये घाबरून लपली होती, ती दाटझाडी म्हणजे वारकऱ्यांनी आपल्या लाडक्या विठ्ठलाकरिता बनवलेली तुळसीमाळा होती. वारकऱ्यांची दिंडी मृदंग, टाळ, वीणाच्या मधुर स्वरात विठोबा रखुमाईचा जयघोष करीत मंदिरात दाखल झाली. पांडुरंग पांडुरंगच्या नादात

वारकऱ्यांनी तुळशीमाळा आपल्या विठुरायाच्या गळ्यात घातली. तुळशीमाळेत घाबरून लपलेल्या मुंगीने तुळशीचे पानं बाजूला करून समोर पाहिले ते काय? समोर प्रत्यक्ष सावळा विठुराया! मुंगी तिच्या सावळ्या विठुरायाला डोळ्यासमोर प्रत्यक्ष पाहत होती. मुंगीला काही कळेना! ती मनाशीच बोलली हे माझे स्वप्न आहे की सत्य आहे . काही वेळानी मुंगी भानावर आली. आणि मुंगी आपल्या विठुरायाला कडकडून भेटली. काय तिचे भाग्य थोर! विठ्ठलाने मुंगीच्या मनातली आंतरिक इच्छा जाणून मुंगीला अलगद उचलून स्वतःजवळ घेऊन आले.

आपली जर इच्छाशक्ती प्रबळ असेल तर देव देखील आपल्याला मदत करतो.

**डॉ. मिलिंद इंदूरकर**/९५५२६०७६४६

### मंगल कार्यात 'गोंधळा'चे महत्त्व

घर तेथे घराणे, घराणे तेथे कुळ, कुळ तेथे कुळधर्म कुलाचार पाळणे आपल्या हिंदू संस्कृतीचा रिवाज आहे. कुलस्वामिनी अंबाबाईचा गोंधळ हा कुलाचारांमधील एक भाग आहे. कुलदैवत जागृत करण्यासाठी त्याचे पूजन करण्यासाठी जागरण-गोंधळ केले जाते. जागरण, गोंधळ यांच्याकडे लोककला म्हणून पहिले जाते. गोंधळाला लोककलांची जननीही म्हटले जाते.

लग्नाच्या शुभमुहूर्तावर काही दिवसांपूर्वी गोंधळ जागरण कार्यक्रमात जाणे झाले मला उमगलेला गोंधळ महितीस्तव देत आहे.

मी बघितलेला गोंधळ लग्नाच्या मुहूर्तावर आयोजित केला होता. पाटावर स्वच्छ पीत वस्त्रावर धान्याचे अष्टदल काढून अथवा धान्याची रास करून त्यावर श्रीफळासहित कलश मांडला होता. उसाच्या पाच ताटांचा (धाट्यांचा) मांडव तयार करून त्यावर पुष्पमाला अडकविली होती. विड्याच्या पानावर सुपारी ठेवून या चौकावर खंडोबाचा टाक किंवा मूर्ती मांडून या चौकासमोर गीतातून (गोंधळातून) जगदंबा मातेची स्तुती केली गेली. त्या दरम्यान चौकाजवळ दिवटी प्रज्वलित करून त्यावर तेल टाकण्यात आले.

गोंधळ का करावा? (कुलदेवतेस जागृत करून पूजन करून तसेच संकट नाश करण्याची विनंती करण्यासाठी) दिवटीमध्ये जळणाऱ्या तेलासोबत आलेले [illegible] जातात असल्याचे मानले जाते असे गोंधळींनी सांगितले.

गोंधळी मंडळींकडे संबळ, टाळ व तुणतुणे होते. जागरणाची सुरुवात करताना सर्व देवतांना चौकावर येण्याचे आवाहन केले. गोंधळींनी भगवंताची स्तुती करून स्त्री भ्रूणहत्या थांबण्याची विनंती, दारू न पिण्याचे आवाहन करून, आईवडिलांची सेवा करण्याचे, शिक्षण हे काळाची गरज असली तरी शेतीकडे लक्ष द्यावे, कोरोनामुळे रोगराई वाढली म्हणून स्वछता व आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल असे सांगून जनजागृती करत उपस्थितांची मने जिंकली

सर्व प्रकारचे गीत गायन करून ईश्वर पूजन केले. गोंधळी मंडळींनी भक्तांच्या वतीने आदिशक्ती जगदंबा मातेला विघ्न हरण करण्याची विनवणी केली. आदिशक्तीचे गुणगान करून यजमानांसाठी सुख समृद्धी भरभराट व आरोग्य मिळण्यासाठी विनवणी केली. गोंधळ सादरीकरणामध्ये आवाहन, गण, कथन व आरती अशी विभागणी होती. हा गोंधळ म्हणजे मनोरंजन व प्रबोधन याचा सुंदर संगम होता. कथेविना गोंधळ नाही पोथीविना पूजा नाही असे सांगत मध्येमध्ये मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाची कथा, आदिशक्ती जगदंबा देवीची कथा गोंधळींनी सांगितली व शेवटी आरती केली गेली. लोककलेच्या माध्यमातून केले जाणारे प्रबोधन, विविध विषयांवरील जनजागृती सोबतच दैवतांचे स्तवन, पूजन विधी असणारी आपली संस्कृती जगात खरोखर उत्तम असल्याची जाणीव अशा कार्यक्रमातून होते.

**पंकज वसंत पाटील**/९८५०४३०५७९

### सशक्त समाजनिर्मितीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा

'सब समाज के लिए साथ में आगे है बढते जाना' या संघ गीतात सांगितल्याप्रमाणे अगदी लहान लहान समूहात असलेला आपल्या भटके विमुक्त समाजासाठीचे कार्य अगदी जोरात आणि जोमात सुरू आहे.

देव, देश आणि धर्मासाठी आपलं संपूर्ण आयुष्य या समाज बांधवांनी खर्ची घातलं, परंतु नेहमीच समाजाचा तिरस्कार मात्र त्यांच्या पाचवीलाच पूजलेला. असा हा भटका विमुक्त समाज बांधव भारताच्या गौरवशाली इतिहासात, संस्कृती संरक्षणाची कास यांनी धरली तो भटका विमुक्त समाज बांधव. व्यापार, कला-कौशल्य यांच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासात यांचा मोलाचा वाटा आहे असा भटका विमुक्त समाज इतरांच्या तुलनेत मात्र सदैव सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास राहिलेला आहे. आज स्वातंत्र्याला ७५ वर्षे होऊनही न्यूनगंडाने पछाडलेला १९९२ पासून या भटके विमुक्त समाज बांधवांसाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून हा समाज मुख्य प्रवाहात यावा यासाठी भटके विमुक्त विकास परिषद तसेच भटके विमुक्त कल्याणकारी परिषदेच्या माध्यमातून कार्य होत आहे.

मार्च २०२४ मध्ये, या विखुरलेल्या, असंघटित समाज बांधवांना किमान त्यांच्या जगण्यासाठी आवश्यक असलेली सरकारी कागदपत्रे मिळावीत, यासाठी परिषदेतर्फे शासनाकडे आग्रह धरला गेला आणि महाराष्ट्र शासनाने त्याला प्रतिसाद देत राजे उमाजी नाईक विशेष महाराजस्व अभियान अंतर्गत संधी उपलब्ध करून दिली. जानेवारी २४ ते मार्च २४ तसेच जुलै २४ ते ऑगस्ट २४ या कालावधीत भटके विमुक्त विकास परिषद आणि भटके विमुक्त कल्याणकारी परिषद विदर्भ प्रांत यांनी राज्यभरातील आपल्या कार्यकर्त्यांच्या द्वारे या समाज बांधवांच्या सहकार्याने ६२००० नागरिकांच्या वस्त्यांवर, पाड्यावर जाऊन उपलब्ध कागदपत्रांचे सर्वेक्षण केले. सर्वेक्षण केलेल्या ३० जिल्ह्यांतील १५९ तालुक्यांमधील ५६७ वस्त्यांपैकी फक्त १६ जिल्ह्यांतील ६८ तालुक्यांमधील २०२ ठिकाणी विशेष शिबिरे लावून ३२२८० कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. आज यांना शासकीय योजनांचा लाभ काही प्रमाणात का होईना मिळायला लागला.

विदर्भातील नागपूर शहरातील गिट्टीखदान या भागात २० व २१ फेब्रुवारी २०२५ ला बिऱ्हाड परिषदेचे आयोजन केले होते. त्यात विदर्भातील सर्वच जिल्ह्यातून १३७९, बावीस समाजाचे समाज बांधव सहभागी झाले होते. पहिल्यांदाच शासनाचे प्रतिनिधी, महसूल मंत्री यांनी उपस्थित सर्व भटके विमुक्त समाज बांधवांसोबत संवाद साधला. पुन्हा एकदा महाराष्ट्र शासन आपल्या या समाज बांधवांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पाऊल टाकायला सज्ज झाले.

महाराष्ट्र शासन, भटके विमुक्त विकास परिषद आणि भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, विदर्भ प्रांत यांचे सोबत बैठकींचे सत्र सुरू झाले. २१ मे २०२५ ला सर्व जिल्हाधिकारी, अधिकारी वर्ग आणि खुद्द महसूल मंत्री आणि परिषदेचे पदाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे एकत्र येऊन, या कार्याचे महत्त्व समजावून सांगितले. नुकतेच छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत भटके विमुक्त समाज बांधवांसाठी घेतलेले शिबिर त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. विदर्भातील गोंदिया, रामटेक, भंडारा, साकोली, पवनी, उमरेड, कोरडी, कळमेश्वर, कामठी, काटोल, बुलढाणा, मेहकर येथे शिबिरे लावून विविध शासकीय कागदपत्रांचे वितरण झाले आहे.

हे अभियान संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. सशक्त समाजाच्या दिशेने हे अभियान एक प्रेरणादायी पाऊल ठरते आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/७०३८८३९७६२

## प्रासंगिक

# नित्यतीर्थ आळंदी महिमा

**राधिका शरदराव मोहोड**

**संत श्री गुलाबराव महाराज जन्मदिन विशेष (तारखेनुसार)**

आजकाल जी अंधश्रद्धा व ढोंगीपणा भक्तीच्या नावाखाली सर्वत्र रचला जातोय, तो बघून आपल्याला लाभलेल्या श्रेष्ठ संत परंपरेचे विचार व जीवनचरित्र आणखीन प्रकर्षाने सर्वांपर्यंत पोहोचणे ही आज काळाची गरज वाटते. ही श्रेष्ठ विचारसरणी, गुरू-शिष्य परंपरा व निस्सीम भक्ती फार योग्य रीतीने जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे श्रेय वारकरी पंथाला व वारीला जाते.

सर्व समव्यापक, भेदभावरहित, केवळ शुद्ध भक्तिभावाने ओथंबून वाहणारा अद्वितीय सोहळा म्हणजे, वारी व सर्वांना जवळचा व हवाहवासा वाटणारा असा वारकरी पंथ. आदिनाथापासून सुरू झालेला नाथ संप्रदाय, जो निवृत्तिनाथांना लाभला व पुढे निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांचे गुरू झाले. याच ज्ञानेश्वरांनी पुढे वारकरी संप्रदायाची स्थापना केली, जो एक वैष्णव संप्रदाय आहे. इथेच शैव व वैष्णवांचा समन्वय माउलींनी केला आहे. माउलींचे गुरू हे नाथ संप्रदायाचे होते, त्यांच्याच गुरुकृपेने पुढे माउलींनी वैष्णव संप्रदायाचा विस्तार केला, यातून शिव व विष्णू भक्ती ही एकमेकांशिवाय निराळी नसून एकमेकांना पूरक आहे हे सिद्ध होते.



आपणा सारिखे करिती तात्काळ गुरुप्रमाणेच शिष्य देखील गुरूचे कार्य पुढे चालवतात, मुख्यतः त्यासाठीच शिष्य आपला जन्म सिद्ध करतात. माउलींप्रमाणेच समन्वय साधण्याचा प्रयत्न ज्यांनी केला ते म्हणजे समन्वय महर्षी ज्ञानेश्वर कन्या संत श्री गुलाबराव महाराज. शिव व विष्णू भक्तीचा समन्वय तर त्यांच्या जन्मापासूनच पाहायला मिळतो.

महाराजांचे आजोबा राणोजीराव मोहोड, हे निस्सीम शिवभक्त होते. माधानच्या स्वयंभू शिवमंदिरात ते नित्य आराधना करत. शिवरात्रीचे ११ दिवस तर फक्त राणशेणीचे भस्म खाऊन उपवास करत. त्यांच्या शिवभक्तीला प्रसन्न होऊन त्यांना दृष्टांत झाला होता की, तुझ्या कुळात एक तेजस्वी महापुरुष जन्म घेणार व पुढे श्री महाराजांचा जन्म झाला. महाराज देखील फार निस्सीम शिवभक्त होते, शिवरात्रीचे उपवास, तासन्तास ध्यान इतकेच नव्हे तर अतिशय जहाल सोमल विष देखील महाराजांनी या शिव मंदिराच्या परिसरात प्राशन केले होते, तरीदेखील त्यांना काही झाले नाही व यावरून नंतर हे कोणी साधारण पुरुष नव्हे हे आजूबाजूच्या मंडळींना जाणवले. या स्वयंभू पुरातन व महाराजांच्या अवतार कार्याची साक्ष असणाऱ्या, विश्वेश्वर शिव मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम माधान येथे सध्या सुरू आहे.

शिवभक्तीबरोबरच कृष्णभक्तीची ओढ लहानपणापासूनच श्री महाराजांना होती. त्यांचे जन्मस्थान लोणी टाकळी येथे त्यांच्या आजोळी साक्षात बाळकृष्ण त्यांच्यासोबत जेवायला येतात असे ते त्यांच्या आजीला सांगायचे. पुढे मधुराद्वैत संप्रदायाची स्थापना श्री महाराजांनी केली. या संप्रदायाचे मूळ सूत्रच कृष्ण व शिवभक्तीचा समन्वय साधणारे आहे. शिव आणि विष्णू हे दोघेही समसमान व एकमेकांना आराध्य आहेत. या श्रेष्ठ गुरुपरंपरेचे उदाहरण आजही आपल्याला आळंदीत पाहायला मिळते. आराध्य असलेल्या सिद्धेश्वर महादेवाची आज्ञा घेतल्याशिवाय माउलींची पालखी पंढरपूरला निघत नाही व कौल/आज्ञा म्हणून महादेव मंदिराचा कळस साक्षात हलतो, तो सुख सोहळा प्रत्यक्ष अनुभवणारे, तो भक्तिमय परिसंवाद जाणतातच. इतके बळ खऱ्या भक्तीत असते व श्रेष्ठ गुरू-शिष्य परंपरा अशीच परस्पर आदर करणारी असते, हे आपल्याला वारकरी पंथ शिकवतो.

संत श्री गुलाबराव महाराजांनी सद्गुरू प्रेमाच्या भरात आपली ईशनिष्ठा व्यक्त करीत, प्रत्यक्ष भगवतअवतार श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या शरीराची अनध्यस्त विवर्तता व तत्सान्निध्याने आळंदीची नित्य तीर्थता, श्रुती, युक्ती व अनुभवाने ५७ ओव्यांत, नित्य तीर्थ आळंदी महिमा यामध्ये सिद्ध करून दाखविली आहे.

महाराज म्हणतात, वेदांनी ज्यांची कीर्ती गायिली आहे व जे कैवल्याचे दान करतात अशा करुणेची मूर्ती असलेल्या, आळंदी पती सद्गुरू नाथा आपला जयजयकार असो. ज्याचे भगवंताचे ठिकाणी जसे निस्सीम प्रेम असते, तसेच गुरूंचे ठिकाणी आहे त्याला वेदांनी सांगितलेले सर्व अर्थ बरोबर कळतात असे श्रुतींनीही म्हटले आहे. सर्व तीर्थांचे ठिकाणी पवित्र करण्याचे असलेले सामर्थ्य श्री गुरूंच्या चरणांचे अंशभूत सामर्थ्य होय, असे गुरुगीतेत प्रमाण वचन आहे. सातही समुद्राचे स्नान केल्याने जे पुण्य फळ प्राप्त होते, ते सर्व पुण्य श्री गुरूंच्या चरणामृतातील एक बिंदू प्राशन केल्याने मिळणाऱ्या पुण्याच्या एक सहस्रांश देखील नाही, असेच वेदाशास्त्रादिक सर्वांचे म्हणणे आहे. महाराज म्हणतात माझी श्रद्धेची स्थिती या सर्वांहून विशेष आहे. ज्यांनी आपल्या नामाचा मंत्र देऊन मला कृतार्थ केले ते सर्व कल्याणाचे कोठार, केवळ कारुण्याची मूर्ती असलेले आळंदीचे स्वामी, श्री ज्ञानेश्वर महाराज माझे सद्गुरू आहेत.

नरहरी सोनार महाशैव, जनार्दन एकनाथ दत्तभक्त, भानुदास सूर्योपासक, तात, तुकारामादी वैष्णव, नाथादी ब्राह्मण, तुकारामादी कुणबी, शेखमोहम्मद आदी मुसलमान, रोहिदास चांभार, चोखामेळादी महार, कान्होपात्रादी वैश्य, मुक्ताबाईसारख्या ब्रह्मचारिणी आचार्या, जनाबाईसारख्या दासी, नामदेवांची लालन भक्ती, विश्वंभराधिकांचे वात्सल्य, मुक्तकेशी आदी बायांचे माधुर्य हे सर्व या पंथात एकवटले आहे. हा पंथ खास विश्वधर्म होणार! धर्मभेदांचा नाश करून सद्गती देणारा हाच एक पंथ होईल. यातून या पंथाविषयी व माउलींविषयी महाराजांचे असणारे निस्सीम प्रेम, भक्ती व आदर दिसून येतो आणि म्हणूनच त्यांचे ३४ वर्षातील अद्वितीय कार्य त्यांनी माउली चरणी समर्पित केले आहे. अशा या प्रेमळ ज्ञानेश्वरकन्येला जन्मदिनानिमित्त शतशः प्रणाम.

७०५८९४९३३८

### विठुरायाच्या चरणी अंतर्मनाची वारी

आषाढी एकादशी म्हटली की, डोळ्यांसमोर येते ती पंढरपूरची वारी! वारकरी आपले तन, मन आणि धन सर्व काही विठुरायाच्या चरणी अर्पण करून, पदोपदी भगवंताचे स्मरण करीत वारी करतात. काशीच्या पाच यात्रा आणि द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते, असे मानले जाते. त्यामुळे भक्तांच्या मनात वारी करून भक्तीच्या अथांग सागरात डुंबण्याची तीव्र इच्छा निर्माण होते. मात्र, बरेचदा वैयक्तिक अडचणींमुळे किंवा इतर कारणांमुळे प्रत्यक्ष वारी करणे शक्य होत नाही. अशावेळी 'अंतर्मनाची वारी', म्हणजेच आपले मन, श्रद्धा आणि साधनेच्या माध्यमातून मानस रूपाने वारी करणे सहज शक्य आहे.

ज्याप्रमाणे वारीत शेकडो किलोमीटरचा प्रवास करताना वारकरी नामस्मरण करतात, त्याचप्रमाणे आपणही घरी राहून, चालताना, काम करताना भगवंताचा नामजप करू शकतो. वारीतील शिस्त जसे की, सकाळी लवकर उठणे, स्नान करून ध्यान-पूजा करणे, अनावश्यक बोलणे टाळणे, यांचे पालन घरी राहून शक्य आहे.

वारीतील महत्त्वाचा भाग म्हणजे सेवा! आजारी व्यक्तीची सेवा करणे, वृद्धांना मदत करणे, आई-वडिलांची सेवा करणे ही तर मानस वारीतील 'सेवा-दिंडी'च आहे! अशाप्रकारे, मानस वारीचा अनुभव घेत, विठुरायाच्या चरणी आर्ततेने प्रार्थना करू या, ''हे विठुराया, तू भक्तीचा भुकेला आहेस. तुझ्या चरणांशी येण्यासाठी तुझी भक्ती तळमळीने कशी करायची, हे तूच आम्हाला शिकव. आणि त्यासाठी तूच आम्हाला भक्ती आणि शक्ती दे!''

### मन सुद्ध तुझं गोष्ट हाये पृथ्वी मोलाची

आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्रभरातून वारकरी आणि विठ्ठलभक्त विठ्ठलाच्या ध्यासाने पंढरपूरला निघाले आहेत. साऱ्या चिंता, व्यथा, काळज्या यांचा भार विठ्ठलावर निर्धास्तपणे टाकून वर्षानुवर्षे वारी करत आहेत. ही वारी विठ्ठलाला अपेक्षित व्हावी, त्या वारीचा आध्यात्मिक लाभ व्हावा असे प्रत्येकाला वाटणे साहजिकच आहे. परंतु त्यासाठी काही यमनियमांचे पालन करायला हवे. वारीला जाताना मुखामध्ये अखंड नामजप असावा, वारीमध्ये अठरापगड जातीचे लोक सहभागी झालेले असतात. गरीब-श्रीमंत सगळ्यांचाच वारीमध्ये सहभाग असतो. या सर्वांशी आपले वागणे प्रेमाचे, आपुलकीचे, जिव्हाळ्याचे असले पाहिजे. वारीमध्ये आबालवृद्ध लोक देखील असतात. त्यांना काही अडचणी आल्या तर तत्परतेने त्यांना मदत करायला पाहिजे. कुणाला बरे वाटत नसेल त्याच्या प्रकृतीची काळजी घ्यायला पाहिजे. कोणाला काही त्रास होतो का किंवा आपल्यामुळे देखील कोणाला काही त्रास होतो याकडे देखील आपले लक्ष हवे.

वारीमधील लोकांशी आपले वागणे असे हवे वारी संपल्यावर देखील त्या लोकांनी आपल्याला लक्षात ठेवले पाहिजे, आपली आठवण काढली पाहिजे. आपल्या अंतर्मनाची निर्मळता वारीमध्ये आपल्या कृतीतून, बोलण्यातून आणि वागण्यातून सर्वांना दिसली पाहिजे. अशी वारी आपल्याकडून घडली तर ती विठ्ठलाला नक्कीच आवडेल. यासाठी आपले मन शुद्ध, पवित्र, निर्मळ ठेवून वारीमध्ये सहभागी होऊयात.

**प्रकाश जोशी**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आषाढी एकादशीनिमित्त नर्सी नामदेव येथे हजारो भाविकांची गर्दी

## भाजप आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचे हस्ते महापूजा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जुलै**

संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथे रविवार दि ६ जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सपत्नीक संत नामदेव महाराज यांची महापूजा केली. दिवसभरात सुमारे दीड लाखांपेक्षा जास्त भाविकांनी दर्शन घेतले होते. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता तसेच भाविकांसाठी विविध सुविधा देखील प्रशासन आणि मंदिर संस्थानच्यावतीने करण्यात आल्या होत्या.

आषाढी एकादशी निमित्त सकाळपासूनच संत नामदेव महाराज यांच्या पावनभूमीत जिल्ह्यासह परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. हरिनामाच्या गजरात सकाळपासूनच नर्सी नामदेव नगरी दुमदुमल्याचे दिसत होते. सकाळी सात वाजता आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते महापूजा करण्यात आली. यावेळी तहसीलदार श्रीकांत भूजबळ, संस्थानचे उपाध्यक्ष भिकाजी किर्तनकार, विश्वस्त मनोज आखरे, द्वारकादास सारडा, भिकुलाल बाहेती, राहुल नाईक, ब्रिजलाल तोष्णीवाल, संतोष टेकाळे, उपसरपंच ज्ञानेश्वर किर्तनकार यांच्यासह भाविकांची उपस्थिती होती.

आषाढी एकादशी निमित्त भाविकांनी सकाळपासूनच संत नामदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या. यासाठी हिंगोली आगाराने नर्सीला जादा बसेस सोडल्या होत्या. गिलोरी येथील भाजपचे तालुकाध्यक्ष माणिकराव लोडे यांच्यावतीने ४० क्विंटल शाबुदाणा खिचडी भाविकांसाठी करण्यात आली होती.

दिवसभर पंचक्रोशीतील भाविक संत नामदेव महाराज यांच्या दर्शनासाठी दाखल होत होते. यावेळी प्रशासनाच्यावतीने महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते तसेच आरोग्य शिबीरात रूग्णांची तपासणी व औषधोपचार करण्यासाठी आरोग्य पथक तैनात करण्यात आले होते. सेवानिवृत्त तालुका आरोग्य अधिकारी डॉ नामदेव कोरडे यांनी त्यांच्या पथकासह भाविकांची सेवा केली तसेच सेवा भारतीच्यावतीने या ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी अनेकांनी या शिबीरात रक्तदान केले.

यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोलिस उपाधिक्षक सुरेश दळवी यांनी नर्सी येथे भेट देऊन पोलिस बंदोबस्ताचा आढावा घेतला. सहायक पोलिस निरीक्षक अशोक घारगे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी चोख पोलिस बंदोबस्त लावला होता.



# मुख्य कार्यकारी अधिकारी यांची ब्रम्हपूरी गावाला भेट

## स्मार्ट ग्राम योजनेंतर्गत गावाची केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**

मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी ब्रम्हपुरी येथे जिल्हास्तरीय स्मार्ट ग्राम योजनेअंतर्गत पाहणी करण्यासाठी भेट दिली. गावातील ग्रामस्थांची चर्चा करून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी अंगणवाडी बांधकामासाठी व सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी दिल्या. ब्रह्मपुरी ते हनवत खेडा या गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर कयाधू नदीमध्ये पुलाचे अंदाजपत्रक बनवून काम करण्याचे आदेश दिले. गावामध्ये बसची सुविधा नसल्यामुळे बस उपलब्ध करून देण्याची आश्वासनही दिले. गावांतर्गत रस्ते करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. गावाचा परिसर व गाव पाहणी केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश गावकऱ्यांचे कौतुक केले. गावातील हेमाडपंथी भैरवनाथ मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेतले व गावातील स्मशानभूमी व शाळेची पाहणी केली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर पथनाट्य सादरीकरण केले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी योगेश कुमार मीना, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापौड, कार्यकारी अभियंता शिवाजी पद्मने अतुल साळुंखे आरोग्य अधिकारी डॉक्टर कैलास शेळके सहाय्यक गटविकास अधिकारी विष्णू भोजे ग्रामपंचायत अधिकारी गजानन राऊत, विस्तार अधिकारी ब्रह्मदेव डोरले, विस्तार अधिकारी खिस्ते साहेब उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालयात त्यांनी गावकऱ्याची संवाद साधला यावेळी सरपंच शितल घनघाव, उपसरपंच शिवकन्या तावरे, ग्राम पंचायत चे सर्व सदस्य, तंटामुक्ती अध्यक्ष, विविध सहकारी सोसायटीचे चेअरमन, रोजगार सेवक, संगणक परिचालक, अशा वर्कर, अंगणवाडी सेविका, यांच्यासह बचत गटाच्या महिलांची उपस्थिती होती.

# आणीबाणीच्या विरोधात अभाविपच्यावतीने मशाल रॅली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, हिंगोली शाखा औंढा नागनाथ यांच्यावतीने औंढा नागनाथ शहरात आणीबाणीच्या विरोधात मशाल यात्रेचे आयोजन करण्यात आले.

काँग्रेसच्या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लागू केली होती. या आणीबाणीला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यावेळी विद्यार्थी परिषदेच्या अनेक कार्यकर्त्यांनी आणीबाणीच्या विरोधात जाऊन तुरुंगवास भोगला. त्यामध्ये प्रामुख्याने स्वर्गवासी माजी केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली सोबत अनेक विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी तुरुंगवास भोगला. त्याचा निषेध म्हणून विद्यार्थी परिषदेने या मशाल यात्रेचे आयोजन औंढा नागनाथ शहरांमध्ये केले होते. यावेळी देवगिरी प्रदेश सहमंत्री प्रवीण पांडे, औंढा नागनाथ शहर मंत्री क्षितिज देव, हिंगोली जिल्हा संयोजक वैभव कोटकर, सुशांत इखे, प्रदीप पवार, सोमनाथ मोरे, अविष्कार गिरीकर, पवन राठोड, सुशील आरू, राज ठाकरे, ओम पोले, कृष्णा देशमुख यांसोबत अनेक विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.




# वसमतच्या उपजिल्हा रूग्णालयात ११ वर्षानंतर प्रथमच प्रसुती



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ७ जुलै**

वसमत येथे स्वतंत्र महिला रूग्णालय स्थापन झाले. परंतु दि ६ जुलै रोजी एका गरोदर महिलेला तीव्र वेदना होत असल्याने त्यांच्या नातेवाईकांनी महिला रूग्णालयाऐवजी उपजिल्हा रूग्णालयात गरोदर महिलेला भरती केले. कमी वेळ असल्यामुळे उपस्थित वैदयकीय अधिकाऱ्यांनी महिलेची सुखरूप प्रसूती केली. अकरा वर्षानंतर या रूग्णालयात प्रथमच प्रसुती झाली. आषाढी एकादशीच्या दिवशी जन्मलेल्या बाळाचे सर्वांना आनंद झाला.

दिनांक ६ जुलै रोजी उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे सकाळी नऊ वाजून वीस मिनिटांनी नऊ महिने पूर्ण झालेल्या गरोदर माता पोटात तीव्र वेदना होत असल्याने अपघात विभागात आल्या होत्या. कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी संभाजी कदम व अधिपरिचारिका रेणुका अस्पतवाड यांनी तपासणी केली असता गर्भपिशवीचे तोंड पूर्ण उघडल्याने प्रसूती पाच ते दहा मिनिटातच होईल असे नातेवाईका सांगितले. बाल रोग तज्ञ तथा वैद्यकीय अधीक्षक गंगाधर काळे यांना संपर्क केला. तात्काळ वैद्यकीय अधीक्षक काळे अपघात विभागात हजर झाले. साडेनऊ वाजता कान्होपात्रा यांनी एका गोंडस बाळाला जन्म दिला. बालरोग तज्ञ तथा वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर काळे यांनी बालकाचे लसीकरण केले व माता आणि नातेवाईकांना आरोग्य समुपदेशन केले.

आषाढी एकादशी असल्याने जणू काही पांडुरंगच उपजिल्हा रुग्णालयात अवतरले. वसमत येथे स्वतंत्र महिला रुग्णालय २०१४ ला स्थापन झाल्यापासून प्रथमच उपजिल्हा रुग्णालय येथे प्रसूती झाल्याचे व दोघेही आई व बाळ सुखरूप असल्याचे डॉक्टर काळे यांनी सांगितले.

डॉ. गंगाधर काळे हे उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे वैद्यकीय अधीक्षकपदी रुजू झाल्यानंतर, बऱ्याच वर्षापासून बंद पडलेले शस्त्रक्रिया गृह चालू केले. दर मंगळवारी रुग्णांची डोळ्यांची तपासणी करून शुक्रवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात केल्या जातात. दर बुधवारी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया केल्या जातात. सलग तीन वर्ष राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात उपजिल्हा रुग्णालय वसमतला यश आले आहे.

आमदार राजू भैया नवघरे यांच्या सततच्या पाठपुरवठ्यामुळे उपजिल्हा रुग्णालय येथे दिव्यांग बोर्ड स्थापन करून महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी दिव्यांगांना प्रमाणपत्र दिले जाते, पूर्वी त्यासाठी हिंगोलीला जावे लागत होते. डॉ गंगाधर काळे यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हा रुग्णालय वसमतला गेल्या वर्षी प्रतिष्ठेचा कायाकल्प पुरस्कार मिळाला आहे. आ. नवघरे यांचे पाठपुरवठ्यामुळे उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे डायलिसिस सेंटर मंजूर झाले असून, त्याचे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच हे सेंटर कार्यान्वित होणार असल्याचे व त्याचबरोबर उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे सोनोग्राफी सेंटर मंजूर झाले असून या दोन्ही सेंटरचे लोकार्पण लवकरच करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ काळे यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त

### नर्सी नामदेव येथे महाआरोग्य शिबीर



हिंगोली- श्री संत नामदेव महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या नर्सी नामदेव येथे आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी, धर्मदाय आयुक्त रूग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र नर्सी नामदेव यांच्यावतीने महाआरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेत हजारो भाविक येत असल्यामुळे त्यांच्या औषधोपचाराची सोय करण्यासाठी तसेच आरोग्य तपासणीसाठी शिबीर घेण्यात आले. या शिबीराचा लाभ दर्शनासाठी येणाऱ्या अनेक भाविकांनी घेतला. यावेळी सेवानिवृत्त तालुका आरोग्य अधिकारी डॉ नामदेव कोरडे, सपोनि अशोक घारगे, शैलेश चौधरी, एल पी जोगदंड, आर के ठाकूर, एस जी बेंगाळ यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामीण पोलिसांकडून पेट्रोलिंग दरम्यान चार जणांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ जुलै**

चोरीच्या उद्देशाने लपून बसलेले तसेच धारदार शस्त्रे बाळगणाऱ्या चारजणांना ग्रामीण पोलिसांनी पेट्रोलिंग दरम्यान जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विना नंबर प्लेट असलेल्या दुचाकीवर चोरीच्या उद्देशाने दबा धरून बसलेल्या तसेच घातक शस्त्र बाळगणाऱ्या चार जणांना पोलिसांनी पेट्रोलिंग दरम्यान विविध ठिकाणाहून अटक केली आहे. त्यामध्ये पवन अनिल नरवाडे वय १९ राहोली खुर्द यास खटकाळी बायपास ते गारमाळ रोडवर अटक करण्यात आली. यश गणेश काळे वय १९ पारधीवाडा हिंगोली यास नर्सी फाटा ते डिग्रस कऱ्हाळे रोडवर अटक करण्यात आली तेजस दादाराव खिल्लारे वय २० यास हिंगोली ते वाशिम रोडवरील माळहिवरा येथील पूलाखाली अटक करण्यात आली. आरोपीतांकडून शस्त्रे व इतर साहीत्य जप्त करून त्यांना अटक करण्यात आली. सदरील कारवाई पोलिस निरीक्षक डोंगरे यांच्या पथकाने केली आहे. वाटमारी करण्याच्या उद्देशाने सदरील आरोपी दबा धरून बसले होते.

# वसमतमध्ये आषाढी एकादशी निमित्त भव्य वृक्ष दिंडीचे आयोजन, हिंगोलीत भाजपची पायी दिंडी

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ७ जुलै**

वसमत शहरातील लिट्ल किंग्ज इंग्लिश स्कूल आणि मुक्ताई विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त आयोजित वसमत शहरातून भव्य दिव्य वृक्ष दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावर्षी या वृक्ष दिंडीचे आठरावे वर्षे होते. सकाळी नऊ वाजता वसमत येथील तहसील कार्यालय समोर वसमतच्या तहसीलदार सौ .शारदा दळवी यांच्या हस्ते दोन वटवृक्ष (वडाच्या) झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच हिंगोलीत आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या नेतृत्वात हिंगोली ते नर्सी नामदेव पर्यंत पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील शाळा, महाविद्यालय तसेच पतंजली योग समितीच्यावतीने दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

वसमत येथे तहसीलदार शारदा दळवी यांच्याहस्ते वृक्षारोपन करण्यात आले. दोन्ही वडाची झाडे तहसील समोर विठ्ठलाचे झाड म्हणून शाळेच्या वतीने त्याचे संगोपन करण्यात येणार आहे. वृक्षारोपणानंतर तहसीलदार शारदा दळवी यांनी वृक्ष पालखीचे पूजन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी वसमत ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गजानन बोराटे आणि शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुधीर वाघ उपस्थित होते. या वृक्षदिंडीत झाडे लावा झाडे जगवा झाडच निसर्गाचा समतोल लागतील अशा स्वरूपाचे स्लोगन असलेले शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते. या पालखीत विठ्ठल रूखमाई महाराष्ट्रातील विविध साधुसंत यांचा जिवंत देखावा शाळेने साकारला होता. ही वृक्ष दिंडी पालखी पुढे गवळी मारुती मंदिर, शहर पोलीस स्टेशन, मामा चौक झेंडा चौक, वसमत शहरातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर आणि शहर पोलीस स्टेशन मार्गे बँक कॉलनीत विसर्जित करण्यात आली. शाळेच्या परिसरात भव्य गोल रिंगण करून या पालखीचासोहळ्याचा समारोप करण्यात आला. या पालखीचे पूजन शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यापारी बांधव आणि नागरिकांनी पुष्पवृष्टी करून केले. त्यामुळे काही काळासाठी वसमत शहर या पालखी सोहळ्याच्या गजराने विठू नामाच्या गजरात आणि झाडे लावा झाडे जगवाच्या संदेशात तल्लीन झाले होते.

मागील आठरा वर्षापासून शाळेने ही वृक्षदिंडीची परंपरा याही वर्षी कायम राखली आहे आणि शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक मूल एक झाड असे शाळेतील सातशे मुलांची सातशे झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प यावर्षी आषाढी एकादशीनिमित्त शाळेने केला आहे. अतिशय सुंदर शिस्तीत हा पालखी सोहळा संपन्न करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक शंकर घोडके संस्थापक प्रा. डॉ. नामदेव दळवी, उपप्राचार्य राम ढोरे व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.







हिंगोली येथे गांधी चौकातून भाजपच्यावतीने हिंगोली ते नर्सी नामदेव पायीदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, सरचिटणीस उमेश नागरे, कैलास शहाणे, संजय ढोके, श्रीमती सुनीता मुळे, रजनी पाटील, क्रिष्णा रूहीटीया, अमित रूहीटीया, कैलास काबरा, दिनेश बगडीया, उमेश गुठ्ठे, पवन उपाध्याय, श्रीरंग राठोड, बाबा घुगे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आषाढी एकादशी निमित्त सर्वत्र विठू नामाचा गजर होत असताना हिंगोलीत पतंजली योग समितीच्या वतीने योग दिंडीचे आयोजन करण्यात आले.

पतंजलीच्या महामंत्री शितल तापडिया यांच्या संकल्पनेतून गेल्या दोन वर्षापासून संत नामदेव पोलीस कवायत मैदान ते देवडा नगर विठ्ठल रुक्माई मंदिर पर्यंत योग दिंडीचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी पतंजलीचे भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी विठ्ठल सोळंके, युवा प्रभारी राजकुमार टिळे, सह प्रभारी बालासाहेब हरण, अशोक पवार, योगशिक्षक वामनराव टाकळगव्हाणकर, काशिनाथराव घुगे, पंडित गुट्टे, महिला जिल्हा प्रभारी ज्योती वाघमारे आदी सह शहरातील विविध योग वर्गामध्ये साधना करणाऱ्या योग साधकांनी देखील यामध्ये सहभाग घेतला. शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांनी आषाढी एकादशीनिमित्त दिंड्या काढल्या. यावेळी शहरातील वातावरण भक्तीमय झाल्याचे दिसत होते.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## फळबाग लागवडीला शेतकऱ्यांचा कल; कृषी विभागाचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ जुलै -**



धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने व तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे यांनी आज थेट शेतात भेट देऊन शेतकऱ्यांना फळबाग व तुती लागवडीसाठी प्रोत्साहन दिले.

शेतकऱ्यांनी न डगमगता या पिकांना प्राधान्य द्यावे, अडचणी दूर करण्यासाठी कृषी विभाग सज्ज आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी कृषी अधिकारी एम. पाटील, संभाजीराजे माळी, मंडळ कृषी अधिकारी अरनाळे, कृषी सहायक विनोद भाग्यवंत, दिपक कोल्हे, मनिषा मस्के, बाळासाहेब घोगरे, डायरेक्टर गणेशदादा नेटके, तसेच अमोल मोरे, मोहन मोरे, उत्कर्ष देशमुख, तानाजी पाटील, नवनाथ घाडगे, निखिल मोरे, लव्हू जाधव, मोहन थोरात, अजित मोरे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### मोफत साबुदाणा खिचडीचे वाटप

**तुळजापूर, दि.६ जुलै -**

आषाढी एकादशीनिमित्त तुळजाभवानी मंदिरासमोर देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील प्रसाद पानपुडे यांच्या वतीने ५१ किलो साबुदाणा खिचडीचे मोफत वाटप करण्यात आले. मंदिर महाद्वार समोर अनेक भाविकांनी याचा लाभ घेतला. यावेळेस नागेश नाईक, बाळासाहेब शिंदे, इंग्रजीत साळुंके, शिवाजी बोधले, धैर्यशील दरेकर, राम चोपदार, दिनेश बागल, अक्षय पानपुडे, स्वराज पानपुडे, प्रसाद पानपुडे यांची उपस्थिती होती.

### 'स्वामी विवेकानंद'मध्ये वारकरी दिंडी

**उमरगा, दि.६ जुलै -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या वतीने आषाढी एकादशीच्या निमित्ताने भव्य वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीत विविध साधू-संतांच्या वेषातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उमरगेकरांची मने जिंकली. यंदाही शाळेच्या ११० विद्यार्थ्यांनी हातात टाळ, वीणा, पताका घेऊन दिंडीत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, मुक्ताबाई, विठ्ठल, रुक्मिणी अशा संतांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. काही मुलींनी नऊवारी साडी नेसून तुळशीचे वृंदावन डोक्यावर घेतले होते, या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सविता लोहार, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

### भाविकांना फराळीचे वाटप

**तुळजापूर, दि.६ जुलै -**

एकादशीनिमित्त मठ महंत प्रकाशनाथ उर्फ गरिबनाथ बुवा (दशावतार मठ) च्या वतीने तुळजाभवानी मंदिर महाद्वार समोर तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना शाबु खिचडीचे मोफत वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश सचिव गोकुळ शिंदे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब शिंदे, विलास शिंदे, श्रीनाथ शिंदे, रूद्र शिंदे, राष्ट्रवादीचे शहर सरचिटणीस अभय माने हे उपस्थित होते.

### जिल्हाध्यक्ष पाटील यांचा सत्कार

**परंडा, दि.६ जुलै -**

मराठा सेवा संघाचे नुतन धाराशिव जिल्हाध्यक्ष सतीश पाटील यांचा सत्कार रविवार (दि.६) परंडा येथील मराठा सेवा संघ कार्यालयात संघ व संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी देवानंद टकले, अनंत सुर्यवंशी, अंगद धुमाळ, प्रा. शिवाजी काळे, रामदास ठोंगे, शशिकांत जाधव, राहूल रणदिवे, गोरख मोरजकर, मनोज कोळगे, रविंद्र मोरे, समाधान खुळे, महेश शिंदे, सुहास ठोंगे, सुनिल गटकुळ आदि उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांची ग्रंथ व वृक्ष दिंडी

**उमरगा, दि.६ जुलै -**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने जि. प. स्पेशल प्रा. शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'ज्ञानाशिवाय प्रगती नाही, झाडाशिवाय जीवन नाही' असा संदेश देत गावातून ग्रंथ दिंडी व वृक्ष दिंडी काढली. या दिंडीत विद्यार्थ्यांनी हातात पुस्तक, डोक्यावर रोपटे ठेवून फेरी केली. हनुमान चौक, विठ्ठल मंदिर, साठे नगर, नगरपरिषद व आंबेडकर वाचनालय समोर रिंगण व फुगडी खेळण्यात आली. यावेळी विठ्ठल-रखुमाईच्या वेषात गौतमी लिमये, विश्ववेध मुरूमकर, गुंजन लिमये, कनिष्का किरात सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष निर्मलकुमार लिमये, शिवराज कांबळे, माजी अध्यक्ष आनंदकुमार कांबळे, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे, सुनिता मिरगाळे, शिवाजी गायकवाड, मंगल कचले, रुपचंद ख्याडे यांनी कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.

### खंडेश्वरवाडीत शैक्षणिक साहित्य वाटप

**परंडा, दि.६ जुलै -**

शेतकरी पुत्र आणि पवार उद्योग समूहाचे सर्वेसर्वा शिवश्री रामभाऊ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडेश्वरवाडी येथे १ ली ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमात प्रमुख उपस्थित भगवान जाधव, मधुकर जाधव, आभिराज काळे, केतन पवार, साहिल जाधव, शुभम जाधव, माउली भांडवलकर, बाळासाहेब भांडवलकर तसेच सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मुख्याध्यापक सांळुखे यांनी पवार यांचे आभार मानले.

### आर्या जाधव हिचा सत्कार

**उमरगा, दि.६ जुलै -**

तालुक्यातील तुरोरी येथील आर्या जाधव हिचा आयआयटी परीक्षेत विशेष यश संपादन केल्याबद्दल आषाढी एकादशी निमीत्त सातारा येथील प्रख्यात व्याख्याते व साहित्यिक डॉ. यशवंत पाटणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शांतीदूत परिवारच्या संस्थापक अध्यक्षा विद्या जाधव, डॉ. विठ्ठलराव जाधव, प्राचार्य सोमनाथ महाजन, प्रा. युसुफ मुल्ला, प्रा.जिवन जाधव, प्रा. अभयकुमार हिरास, प्रा. भैरवनाथ कानडे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, माजी मुख्याध्यापक श्याम पाटील, विजय वडदरे, अमर देशटवार, जितेंद्र घोटाळे, संतोष मोहिते, नितीन दुधाटे, दिव्या सूर्यवंशी, अभिजीत जाधव, श्रद्धा जाधव यांच्यासह शांतीदुत परिवारचे सदस्य उपस्थित होते.

# कर्जमाफीची योग्य वेळ व नियम शेतकऱ्यांना स्पष्ट करा

## आमदार कैलास पाटील यांची सभागृहात मुख्यमंत्र्यांकडे मागणी...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जुलै -**

कर्जमाफी करणार असे सांगून सत्तेत आलेल्या सरकारने आता योग्य वेळ व नियम अशी भाषा करत शेतकऱ्यांना गोंधळात टाकले आहे. ही योग्य वेळ नेमकी कधी येणार व काय नियम आहेत, हे राज्यातील शेतकऱ्यांना स्पष्टपणे सांगावे, अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात मुख्यमंत्र्यांना केली.

विरोधी पक्षाच्या २९३ च्या प्रस्तावावर बोलताना आमदार पाटील यांनी सांगितले की, नवीन सरकार स्थापन झाल्यापासून आतापर्यंत राज्यातील १,२६९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्यांचे कारण सरकारने समजून घेतले का? असा सवाल त्यांनी केला.



कर्जमाफीची चर्चा झाली की मुख्यमंत्री नियमांची भाषा करतात. मग नेमकी ती योग्य वेळ कोणती? आणि त्या वेळेस कोणते नियम लागतात? हे स्पष्टपणे सांगावे, असे आवाहन त्यांनी केले.

आजवरच्या कर्जमाफी योजनांमध्ये थकबाकीदार शेतकऱ्यांनाच लाभ मिळाल्यामुळे अनेक शेतकरी मुद्दाम कर्ज थकीत ठेवतात. माझ्या जिल्ह्यात सध्या ६० टक्के शेतकरी थकीत आहेत, मग आणखी किती टक्के शेतकरी थकीत होईपर्यंत सरकार वाट पाहणार? असा सवालही आमदार पाटील यांनी उपस्थित केला.

शेवटी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी सरकारने धोरणे स्पष्ट करावीत, अशी मागणी आमदार पाटील यांनी ठामपणे मांडली.

### तुळजाभवानीचे नयनरम्य विठुमाऊली रूप...

## आषाढी एकादशीनिमित्त श्री तुळजाभवानीच्या रुपात विठ्ठलाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ जुलै -**

आषाढी एकादशी निमित्त श्री तुळजाभवानी मातेस विठुरायाच्या रूपात साज करून विशेष महापूजा करण्यात आली. पांडुरंगातील आई तुळजाभवानीचे रूप पाहण्यासाठी भाविकांनी देवी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती.

आज दि.६ जुलै रोजी आषाढी एकादशी असल्याकारणाने पांडुरंगाचा विशेष रूपातील साज घालून आई भवानीची देवीची नित्योपचार पूजा करण्यात आली यामध्ये तुळजाभवानी मातेस मळवट भरून त्यावर विठ्ठलाचा वारकरी संप्रदायाचा चंदन अष्टगंध आणि बुक्का मध्ये सुंदर आकर्षक असा विठ्ठलगंध काढण्यात आला तर डोक्यावर मोरपिसारा लावण्यात आला. वारकरी संप्रदाय मधील मानाच्या तुळशीच्या पानांसोबत विविध रंगाची सुंदर गुलाब फूल ओऊन केलेला आकर्षक हार देवीजींना घालण्यात आला होता त्याचबरोबर लिंबाची माळ देखील




घालण्यात आली. गडद निळ्या रंगाच्या साडीवर जरीचे लाल रंगाचे काठ असणारी सुंदर साडी आई तुळजाभवानीला नेसवण्यात आली होती. मोगऱ्याच्या फुलांचे गजरे घातल्यामुळे तुळजाभवानीचे विठूमाऊली रूप नयनरम्य होते.

आषाढी एकादशी असल्याने श्री क्षेत्र तुळजापूर मध्ये भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती. तर आई राजा उदो उदो च्या घोषणा सोबत विठ्ठल हरी नामाचा गजर तुळजाभवानी मंदिरामध्ये वाजत होता. आषाढी एकादशीनिमित्त आई तुळजाभवानी मंदिर आणि परिसरामध्ये भक्तीमय वातावरण पसरले होते.

## लोहगाव येथे बैलगाडी उलटल्याने शेतकऱ्याचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.६ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील लोहगाव येथे बैलगाडी उलटल्याने एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शनिवार (दि.५) रोजी लोहगाव येथील शेतकरी बब्रुवान नागुराव खटके (वय ७०) हे शेतकरी लोहगाव शिवारात एका शेतकऱ्यांच्या शेतात पेरणीचे काम उरकून सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास बैलगाडी घेवून गावाकडे घरी येत असताना अचानक बैलगाडीचे चाक निघाल्याने बैलगाडी उलटली यामध्ये शेतकरी बब्रुवान खटके हे खाली पडले आणि गाडीखाली पडल्याने डोक्यास जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पार्थिवावर रविवार (दि.६) रोजी सकाळी ९ वाजता लोहगाव येथील स्मशानभूमीत अग्निसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, दोन मुली, नातवंडे, भाऊ असा मोठा परिवार आहे.

## नळदुर्गमध्ये आषाढी एकादशीनिमित्त भव्य पालखी मिरवणूक उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ जुलै -**

आषाढी एकादशी निमित्त नळदुर्ग शहरातील मराठा गल्ली येथील भजनी मंडळाच्या वतीने दि.६ जुलै रोजी टाळ-मृदंगाच्या गजरात विठ्ठल-रुक्मिणीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमुळे शहर भक्तिमय वातावरणाने न्हालं.



मिरवणूक विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून सुरू होऊन शहरातील प्रमुख चौकातून फेरी मारून पुन्हा मंदिरात विसर्जित झाली. मार्गावरील चौकाचौकात नागरिक, विशेषतः महिलांनी रांगोळ्या, फुलांची उधळण करत स्वागत केले.

मिरवणुकीत भजनी मंडळाचे मोहीत कलकोटे, तानाजी जाधव गुरुजी, मिलिंद भुमकर, बलभीमराव मुळे, सुहास येडगे, तसेच शिवशाही तरुण मंडळाचे कार्यकर्ते आणि महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या वतीने केळी व शाबुदाण्याचा चिवडा वाटप करण्यात आला. मिरवणुकीनंतर मराठा गल्ली येथे सर्व भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

या मिरवणुकीत भजनी मंडळाचे मोहीत कलकोटे, खाटमोडे, तानाजी जाधव, मिलिंद भुमकर, बलभीम मुळे, सुभद्रा मुळे, विमल काळे, महेश जाधव, संजय बेले, मोहन डोंगरे, सुहास येडगे, तानाजी जाधव, तानाजी मुळे, कुरुक्षेत्र किल्लेदार, विलास येडगे, सुधीर हजारे, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकुर, अन्ना जाधव, तुकाराम जाधव, धनाजी जाधव, दीपक काशिद, डॉ. दीपक जगदाळे, अमर भाळे, सुधीर हजारे, अमोल सुरवसे, बालाजी ठाकुर, शिवाजी सुरवसे, तानाजी सुरवसे, प्रशांत पवार यांच्यासह शिवशाही तरुण मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व भजनी मंडळाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरपंच व सदस्यांसाठी विशेष कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ जुलै -**

ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार व केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायतींच्या स्थानिक विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तालुकास्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा दि.१० जुलै रोजी उमरगा येथील नवीन पंचायत समितीच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडणार आहे.

## इंदिरा गांधी लिटल चॅम्पचे चिमुकले बनले वारकरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ जुलै -**

इंदिरा गांधी लिटल चॅम्प रुईभर येथील छोट्या चिमुकल्यानी वारकरी वेशभूषेत दिंडीचे आयोजन केले होते. त्यांच्या उत्साहाने पूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. चिमुकल्यानी भारतीय संस्कृतीत महाराष्ट्राच्या अध्यात्मिकतेची ओळख करून देत सर्वांची मने जिंकली.

अगदी लहान वयातच अध्यात्मिकतेची ओढ निर्माण होणे आवश्यक आहे. डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे व हभप. शिवाजी बारगुळे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन केले व विठ्ठल-रुक्मिणीच्या व वारकऱ्यांच्या वेशभूषेत टळ मृदंगाच्या गजरात आणि तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन गावात दिंडीची फेरी काढण्यात आली.

हा सोळा पाहून लोक चिमुकल्यांचे कौतुक करत होते. चिमुकल्यांना वारकरी वेशभूषेत प्रवृत्त करण्यासाठी मुख्याध्यापिका मनिषा किरदत, तनुजा कोळगे, संगिता वडवले यांनी परिश्रम घेतले.

या चिमुकल्याचे कौतुक रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांनी कौतुक केले.

## 'संकल्प से सिद्धी' अंतर्गत कळंबमध्ये इंदिरा नगर भागात जनता दरबार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ जुलै -**

संकल्प से सिद्धी अंतर्गत आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आज कळंब शहर तालुका अंतर्गत इंदिरा नगर भागात जनता दरबाराचे आयोजन केले होते.



नगर परिषद प्रशासन करत दुर्लक्ष याबाबत जनतेच्या मनात प्रचंड रोष लोकांच्या तक्रारीतून दिसून आला. कचरा उचलत नाहीत आणि नाली साफ होत नाही प्रशासन हतबल दिसून येत आहे. लोकांच्या आरोग्याशी खेळ होत असल्याची व्यथा यानिमित्ताने ऐकायला मिळाल्या. भारतीय जनता पार्टी हा विषय गांभीर्याने घेऊन लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात नक्कीच कळंब नगर परिषद प्रशासनाला जाब विचारेल आणि शहर स्वच्छता करण्यासाठी भाग पडणार आहे.

किशोर वाघमारे, शिवाजी शेंडगे, सचिन तिरकर, धनंजय आडसुळ, अशोक क्षीरसागर, रुपेश कांबळे यांनी पुढाकार घेतला. कळंब शहरात हा जनता दरबार कळंब शहर तालुका अध्यक्ष मकरंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

यावेळी सतपाल बनसोडे, प्रकशकाका भडंगे, परशुराम देशमाने, भूषण करंजकर, सुदर्शन देशमुख, गोविंद आडसुळ, इलियास कुरेशी, छाया बोंदर, संगीता कोकीळ यांच्यासह महिला व आदी नागरिक उपस्थित होते.

## आनंत घोगरे यांना आयकॉन ऑफ द महाराष्ट्र पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ जुलै -**



धाराशिव जिल्ह्यातील आनंत घोगरे-पाटील यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची मातृभूमी सोशल फाउंडेशन पुणे या संस्थेने दखल घेऊन घोगरे-पाटील यांना सामाजिक आयकॉन ऑफ द महाराष्ट्र हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे. हा पुरस्कार वितरण पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थित संपन्न होणार आहे.

## कळंबमध्ये ध्यान धारणा मौन साधनापूर्व अभ्यास

**कळंब, दि.६ जुलै -**

परमपूज्य श्री लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज महायुग ट्रस्ट च्या कळंब च्या वतीने ध्यान धारणा मौन साधनापूर्व अभ्यास ट्रस्टचे कार्यवाहक कल्याण खापे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्याभवन हायस्कूल कळंब व नारायणराव लोमटे विद्यालय भाटशिरपुरा या शाळेतील अकराशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दोन्ही शाळेत जाऊन याची माहिती देण्यात आली. या साधनेसाठी विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी सकाळी सहा ते साडेसहा या वेळेत शांत बसून मौन साधनेचा लाभ घेतला.

# इंदिरानगर वसाहतीच्या भोगवटादारांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न

### जनता दरबारमध्ये नागरिकांना आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ जुलै -**

इंदिरानगर येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला व येथील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ भोगवटादारांना मिळावा, हा प्रश्न आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून सोडवू, असे आश्वासन भाजपचे सुशांत भुमकर यांनी दिले.

शहर भाजपच्या वतीने संकल्प ते सिद्धी अभियानांतर्गत दर शनिवारी आयोजित होत असलेल्या जनता दरबाराचा भाग म्हणून प्रभाग क्र. २ इंदिरानगर येथे दि. ५ जुलै रोजी जनता दरबार घेण्यात आला. या दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ, पाण्याचा प्रश्न आणि बंद असलेल्या पथदिव्यांचा मुद्दा मांडला.

या वेळी सुशांत भुमकर यांनी सांगितले की, शहरात सध्या नवीन पाणीपुरवठा योजनेसह अनेक विकासकामे सुरू असून, इंदिरानगरच्या नागरिकांचा आवास योजनेचा प्रश्न लवकरच निकाली काढला जाईल.

कार्यक्रमात शहर भाजप अध्यक्ष बसवराज धरणे, माजी उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, निरंजन राठोड, श्रमिक पोतदार, दत्तात्रय कोरे, पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, पांडुरंग पुदाले, संजय जाधव, सुनील बनसोडे आदी उपस्थित होते.



जनता दरबारात नागरिकांनी केलेल्या ३५ तक्रारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून सोडवणार असल्याचे अध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्पना गायकवाड यांनी केले, तर आभार धीमाजी घुगे यांनी मानले. दरबाराला इंदिरानगर परिसरातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आयुष्य शेतकऱ्यांसाठी लढण्यात घालवले, मात्र मला बदनाम करण्याचा विरोधकांचा डाव -आ.लोणीकर

## आ. लोणीकरांनी केले परतूरच्या बालाजी मंदिराच्या संरक्षक भीतीच्या कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परतुर । सुरेश कवडे पाटील**

परतुर येथील श्री बालाजी मंदिर येथे वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत नगर विकास खाते अंतर्गत २० लक्ष रुपये खर्चाच्या संरक्षक भिंतीच्या कामाचे शुभारंभ करण्यात आले. यावेळी भाजपचे प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यासपीठावर भाजपचे तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, बालाजी मंदिराचे विश्वस्त भिकूलाल लोया, व्यापारी असो. चे अध्यक्ष सुरेशजी मंत्री, बाजार समितीचे सभापती संभाजी वारे, विहिप चे सावताजी काळे, कृऊबा संचालक दिनेशजी होलानी आदींची उप-स्थिती होती.

सदरील कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत मंदिराचे विश्वस्त सदस्य राजेश मंत्री यांनी सदरील मंदिराचा इतिहास ८० वर्षाचा असून समाज बांधवांच्या दानधर्म व निधीतून मंदिराचा विकास झालेला आहे सदरील ठिकाणी राजस्थानी समाजा सह हिंदू समाजातील विवाह इतर कार्यक्रम अल्प दरात होत असतात. यासाठी गतवर्षी संगीत रामायण कथेत आलेले राहुल भैया लोणीकर यांनी स्वमरजीने श्री बालाजी मंदिराच्या विकास कार्यासाठी दहा लक्ष रुपयांची निधी उपलब्ध करून देऊ असे सांगितले मात्र वर्षभरातच दहा लक्ष ऐवजी २० लक्ष रुपयांचा निधी दिला आता तुम्ही बोट दिले आता आम्ही हात सोडणार नाही असे सांगत मंत्री यांनी मंदिरासाठी विकासात्मक कार्यासाठी अधिक निधीची मागणी केली.

याला उत्तर देताना राहुल भैया लोणीकर यांनी परतूर शहरात बालाजी मंदिर हे भक्तीचे स्थान असून राजस्थानी समाजासह सर्व समाजाचे दैवत श्रीराम रुपी बालाजी परमेश्वराची सेवा करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत आम्ही बोट दिले तुम्ही हात धरले मात्र आमचा हात कधीही सोडू नका असे सांगून हशा पिकविला.

याप्रसंगी आमदार लोणीकर साहेब यांनी मतदारसंघातील तीर्थक्षेत्र पर्यटन क्षेत्र व प्रत्येक गावात समाज मंदिर बांधण्याचे



कार्य केलेले आहे दैठणा येथील श्री गुरु गंगाभारती मंदिरासाठी अडीच कोटी रुपये मिळवून दिले त्याचप्रमाणे नांगरतास येथे पर्यटन व तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत भरभरून विकास कार्य केलेले आहे. श्री बालाजी मंदिराच्या विकास कार्यात शासन स्तरावर कुठलीही कमी पडू देणार नाही असा विश्वास त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला. पुढे बोलताना त्यांनी परतूर शहरात केवळ बोटावर मोजण्याइतकेच मारवाडी समाजाचे लोकांचे इथं बसण्यासाठी जागा होती मात्र आज सर्व समाज माझ्यासोबत आहे. व्यापाऱ्यांच्या प्रत्येक सुख दुखात मी सोबत राहिलो व भविष्यातही सोबत राहणार यात तिळमात्र शंका नाही असे यावेळी त्यांनी सांगितले. सदरील मंदिरा-साठी तीर्थक्षेत्र अंतर्गत २५ लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी मी प्रयत्न करेल असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थित त्यांना दिला. मी एक सामान्य शेतकरी कुटुंबातील असून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण मला आहे म्हणून तेवढ्या

> » माझ्या राजकारणाची सुरुवातच शेतकऱ्यांच्या हिताच्या लढाईसाठी झालेली होती, गेल्या ४० वर्षात मी अविरतपणे शेतकऱ्यांसाठी लढलो व आजही शेतकऱ्यांसाठीच लढत आहे हे माझ्या मतदारसंघातील शेतकऱ्यांना माहिती आहे मात्र मी जे बोललोच नाही त्याचा विपर्यास करून विरोधकांनी मला बदनाम करण्याचा डाव आखला होता तो पूर्णतः उधळला असून भविष्यातही माझ्या शरीरातील रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढत राहणार.

पोट तिडकीने मी शेतकऱ्यांसाठी लढत असतो मतदार संघाचा कायापालट हा केवळ भाजपच्या शासनात झालेला असून कोट्यवधी रुपयांच्या निधीतून मतदार संघातील रस्ते वीज पर्यटन तीर्थस्थळे व पेयजल व्यवस्था याच्यावर खर्च केलेला आहे गाव तिथे रस्ता व गाव तिथे वाहतूक हे केवळ भाजपच्या शासनातच होऊ शकले. मी आमदार या माध्यमातून सामान्य कार्यकर्त्याच्या भूमिकेतून लोकांच्या हितासाठी विकास कार्य खेचून आणलेले आहेत व तालुक्यात वाढलेली भाजपची शक्ती पाहून पायाखालची वाळू सरकलेले विरोधक मला बदनाम करण्याचा डाव आखत आहेत मात्र माझ्या मतदारसंघातील सुज्ञ मतदार व माझे सहकारी शेतकरी हे सर्व ओळखून आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या माध्यमातून सामान्य शेतकऱ्यांना सर्व स्तरातून मदत करण्यासाठी आपण तत्पर असतो. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश लाहोटी सर यांनी केले तर शेवटी अमोल अग्रवाल यांनी आभार मानले या कार्यक्रमाला मुख्य अभियंता, कंत्राटदार पापासेठ अग्रवाल, परतूर शहरातील गणमान्य व सामान्य व्यापाऱ्यांसह, अशोकराव बरकुले, रमेशराव भापकर, बाबू राठोड, संपतराव टकले, भगवानराव मोरे, दया काटे, डॉ.पोरवाल, ऍड सुरेश काळे, नरेश कांबळे, इंद्रजीत हिवाळे, कैलास बोनगे, यांच्या सह अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर श्री बालाजी मंदिर संस्थांच्या वतीने प्रसादाचा कार्यक्रम झाला. तत्पूर्वी आमदार बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्या हस्ते श्री बालाजी व श्री विठ्ठल रुक्माई यांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवजी मामा दरगड, राधेश्याम मुंदडा, दिलीप होलानी, डॉक्टर स्वप्नील मंत्री, ओमसेठ मोर, योगेश खंडेलवाल, अजित पोरवाल, अमोल अग्रवाल, रोशन, अमर बगडिया, जगदीशसेठ झवर, ओमप्रकाश अग्रवाल, सखाराम शेठ मुंदडा, गोविंशेठ मोर, आनंद मालिक बगडिया, श्रीकिशन अग्रवाल, संजय भापकर, महेश होलानी, ओमसेठ लाठी, नितीन जोशी, रमेशशेठ झंवर, शिवप्रसाद मुंदडा, ओम प्रकाश राठी, पुरुषोत्तम राठी, राजुशेठ पोरवाल, सत्यनारायण अग्रवाल, सौरभ बगडिया, राजुशेठ मोर आदिनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त



### ज्ञानदा प्रायमरी इंग्लिश स्कुल आषाढी एकादशी निमित्त विठठल नामाचा गजर

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

परतुर येथील ज्ञानदा प्रायमरी इंग्लिश स्कूल रोहिना (बू) या शाळेच्या वतीने भक्तीमय वातावरण, पारंपरिक साज आणि आषाढी एकादशी निमित्त शाळेत उत्साहवर्धक रॅली विद्यार्थ्यांनी अनुभवले संस्कृतीचे अनोखे सौंदर्य. आषाढी एकादशी निमित्ताने चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भगवान विठ्ठल तसेच रुख्मिनी यांचे वेशभूषा धारण करत उत्साहवर्धक प्रभात फेरी गावात फिरवून संस्कृतीचे अनोखा उपक्रम राबविला आहे . यावेळी ज्ञानदा प्रायमरी इंग्लिश स्कुलचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ.भगवान दिरंगे सर व्यवस्थापक हनुमंतराव कवडे प्रा.विष्णु वाघमारे प्रा . वैभव कवडे प्रा .दीपक कवडे कु.दुर्गा भोसले सौ. शिवगंगा कचरे विद्यार्थी , शिक्षकवृंद आदी पालकवर्ग मोठया प्रमाणावर उपस्थित होते

### आषाढी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरण; चिमुकल्यांनी वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



आषाढी एकादशी भक्तीभावाने साजरी करण्यात येत आहे.शहरातील विठ्ठल-रूख्मिणी मंदिरात दर्शनासाठी जयत तय्यारी केलेली दिसून येत आहे. दरम्यान,शनिवारी विठ्ठल-रूख्मिणी वेशभूषेतील चिमुकल्यांनी लक्ष वेधून घेतले. शहरात आषाढी एकादशी भक्तीभावाने आणि उत्साहाच्या वाता-वरणात निर्माण झाले. आषाढी एकादशीनिमित्त अनेक भाविकांनी फराळाची जय्यत तय्यारी केली आहे.दरम्यान, दरम्यान, रुक्मिणीच्या वेशभूषा केलेली श्री गणेश देवकर नावाची चिमकुलीने लक्ष वेधले होते.

### बोरगाव जिल्हा परिषद शाळेमध्ये ग्रंथ व वृक्षदिंडी संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

तालुक्यातील बोरगाव बु येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने वृक्ष व ग्रंथ दिंडीच्या आयोजन करण्यात आले होते.संपूर्ण गावचे वातावरण भक्तिमय झाले होते .रविवारी आषाढी एकादशी असल्याने संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलाच्या भक्तीने न्हावून निघाला आहे. त्या अनुषंगाने विज्ञान व अध्यात्माची सांगड घालत बोरगाव येथील जिल्हा परिषदप्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री बी.एल देशमुख व सर्व शिक्षकांच्या समन्वयाने ह्या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थी व गावकरी सहभागी होत दिंडीचा भक्तीमय वातावरणात आनंद लुटला. या दिंडीत सुंदर फुलांनी सजविलेल्या पालखीमध्ये विठ्ठल रखुमाईची मूर्ती,विविध झाडांची रोपे भारतीय संविधानाची प्रत ठेवण्यात आली होती.शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुखुमाई, विणेकरी ,टाळकरी, वारकरी इत्यादी वेशभूषेत या दिंडीत सक्रिय सहभाग घेतला होता गावातील महिलांनी मनोभावे विठ्ठल-रूखमाईच्या पालखीची घरोघरी पूजा केली.संपूर्ण गावातील घरांसमोर सुंदर रांगोळ्या काढण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज चौकात गावकऱ्यांनी शिवरायांचा पोवाडा सादर केला. वारकरी महिला भगिनींनी टाळ वाजवून पावल्या टाकत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. विद्यार्थ्यांनी देखील फुगड्या खेळत पावल्या टाकत दिंडीचा आनंद लुटला. याप्रसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचेमुख्याध्यापक,शिक्षक, शालेय शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच,उपसरपंच यांच्यासह महिलांसह ग्रामस्थ, व युवकांच्या उपस्थिती होती.

## जिवंत व्यक्तीचे मयत बनावट कागदपत्र दाखल करून ६ लाख ७८ हजार लाटले!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

जिवंत व्यक्तीला मयत दाखवून बनावट कागदपत्रे तयार करून बांधकाम कामगार दाखवून बनावट मृत्यू प्रमाणपत्राच्या आधारे ६ लाख ७८ हजारांचे अनुदान लाटल्याचे प्रकरण मंठा तालुक्यात उघडकीस आल्यामुळे खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणी दक्षता पथकातील छत्रपती संभाजीनगर येथील सरकारी कामगार अधिकारी गोविंद गावंडे यांच्या फिर्यादीवरून मंठा पोलिस ठाण्यात गुरूवारी गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत कामगार उपायुक्त गावंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंठा तालुक्यातील आकणी

### मंठा पोलिस ठाण्यात तिघाविरुद्ध गुन्हा दाखल

येथील स्वाती शिवाजी उबाळे , देवराव नारायण बदर , दुर्योधन रामभाऊ जाधव तीन व्यक्तीच्या कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी फिर्यादी व सोबत दक्षता पथकातील कर्मचारी प्रत्यक्ष गेले असता ग्रामसेवक खेडकर यांनी सांगितले की , वरील तिघेही जण आकणी गावचे रहिवासी नसून त्यांना कार्यलयातर्फे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. चौकशीतील अधिकारी यांनी कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर त्यांच्याशी लक्षात आले की , वरील तिन्ही व्यक्तीचे नातेवाईक यांनी बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची व मंडळाची दिशाभूल करून मयत कामगाराच्या वारसा देण्यात येणारी अर्थसहाय्य रक्कम सहा लाख ७८ हजार रुपये लाटले आहेत. सदर नातेवाईक व दलालांनी ग्रामपंचायतचे सही व शिक्के बोगस वापरून ही दिशाभूल करत मोठा भ्रष्टाचार केला आहे.या प्रकरणी मंठा पोलिसात शिवाजी लक्ष्मण उबाळे , कमल देवराव बदर , तेजस दुर्योधन जाधव यांच्या विरोधात मंठा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार संतोष माळगे तपास करत आहेत.

## पत्रकार संघाचे कौतुकास्पद कार्य -ह.भ.प.राम महाराज

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मंठा शाखेच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त रविवार (ता. ६) रोजी येथील वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली मदने, दिलीप जोशी, तुकाराम बोराडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी पांडुरंगाच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ह भ प राम महाराजांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मंठा शाखेच्या वतीने मागील पंधरा वर्षांपासून वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना आषाढीनिमित्त फराळाचे वाटप केले जाते. त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने सामाजिक कार्याचा वसा जोपासला असल्याचे ह भ प माऊली महाराज मदने यांनी सांगितले.जय जय राम कृष्ण हरीचा गजर आणि भजनाने वातावरण भक्तीमय झाले होते. पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार पंडितराव बोराडे, पत्रकार संतोष दायमा, रमेश देशपांडे, आसाराम शेळके, विजयकुमार देशमुख, लखन जयस्वाल यांनी फराळाचे वाटप केले. या कार्यक्रमासाठी नंदू जोशी,श्रीपाद देशपांडे,विश्वांबर कुलकर्णी,प्रसाद लोखंडे श्री शेंडगे यांनी परिश्रम घेतले.

## बदनापूर नगरपंचायतीचा गोंधळ: अग्नीशामक बुलेटचा खाजगी वापर?



**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

बदनापूर नगरपंचायतीकडे अग्निशामक दलासाठी एक मोठी गाडी व एक खास बुलेट आहे. ही बुलेट अत्यावश्यक प्रसंगी, अरुंद गल्लयांत लागलेली आग विझवण्यासाठी वापरण्यात यावी असा उद्देश आहे. मात्र, सद्यस्थितीत ही बुलेट जणू एखाद्या अधिकाऱ्याची खासगी मालमत्ता बनली आहे!

विश्वसनीय सूत्रांनुसार, बुलेटवरील संपूर्ण अग्नीशामक साहित्य काढून टाकण्यात आले असून, ती बुलेट संबंधित अधिकारी वैयक्तिक वापरासाठी सर्रास वापरताना दिसत आहे. त्यामुळे शहरात जर गल्लीत आग लागलीच, तर ती विझवायची कशी? आणि कशाने? या गैरवापरामुळे नागरिकांमध्ये संतापाचा सूर उमटत आहे. नगरपंचायतीच्या मालकीची ही आपत्कालीन सेवा वाहन का आणि कसे खाजगी उपयोगात आणली जात आहे, हा गंभीर प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत. या पार्श्वभूमीवर आता शहरात एक वेगळीच चर्चा रंगली आहे - गाडी दाखवा, बक्षीस मिळवा! ही चर्चा केवळ उपहासात्मक नसून, प्रशासनाच्या निष्काळजीपणावर मार्मिक टीका करत आहे. या प्रकाराकडे जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून दोषी अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे.

> **अग्निशमन सेवा गरजूंकरता की अधिकाऱ्यासाठी?**
>
> बदनापूर शहराच्या संरक्षणासाठी आणलेली अग्निशामक टू व्हीलर (बुलेट) नगरपंचायत च्या मुख्याधिकाऱ्यांनी कवडीमोल गाडी विकण्याचा प्रयत्न केला त्यांना शहराची चिंता नाही पण नगरपंचायत कार्यालयाला आलेल्या जनतेच्या उपयोगाच्या वस्तू त्यांना आमदाराच्या संगणमताने विकण्यामध्ये जास्त आनंद आहे यांना शहराचा विकास न करता स्वतःचा विकास करून घेण्यात जास्त आनंद वाटतो.
>
> **-प्रमोद साबळे मा.नगरसेवक न.प. बदनापूर**

## भगतसिंग बॉईज पदाधिकाऱ्यांचा कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वात काँग्रेसमध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन जालना शहरातील भगतसिंग बॉईज या ग्रुपमधील पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.यावेळी युवा नेते अक्षय गोरंट्याल, सय्यद अझहर,सय्यद जमील, राम घोडके व काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. प्रवेश करणाऱ्यांमध्ये भगतसिंग बॉईजचे प्रमुख लखन नागरे, अक्षय काटकर, कृष्णा परळकर, विशाल मेहरा, गोविंद, करण लिहोरिये, अंश टेकूर, दीपक आंबील ढगे, दिनेश टेकूर, दिनेश पवार, नागेश आंतर, निखिल नागरे, कुलदीप बोरे, गोपाल गोरे, धर्मेश गाणे, अनिल पंडित, राजेश गोरे, राजेश अंतर, विकी चंद्रकड आदींचा समावेश आहे.दरम्यान,काँग्रेस पक्षात प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांचे माजी आमदार कैलास गोरंटयाल आणि युवा नेते अक्षय गोरंटयाल यांनी काँग्रेस पक्षाचा रुमाल देऊन स्वागत केले.जालना शहर महानगर पालिकेच्या आगामी काळात होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत जास्तीत जास्त युवकांना संधी देण्यात येईल असा विश्वास माजी आमदार गोरंटयाल यांनी यावेळी व्यक्त केला.

## पिस्टलचा धाक दाखवून, व्यापाऱ्याचे अपहरण करुन ५० लाख रुपयाची खंडणी मागणारे दोन अट्टल गुन्हेगार जेरबंद; जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक २९/०६/२०२५ रोजी तक्रारदार नामे चंदन बसंतीलाल गोलेच्छा वय ४९ वर्ष व्यवसाय किराणा दुकान रा. आस्था हॉटेलच्या बाजुला जालना यांना पिस्टलचा धाक दाखवुन, तुझी सुपारी मिळाली आहे, तुला जीव वाचवायचा असेल तर ५० लाख द्यावे लागेल असे म्हणुन, त्यांचे अपहरण करुन आरोपींनी ०४ लाख रुपये घेवुन गेले होते. तक्रारदार यांनी दिनांक ३०/०६/२०२५ रोजी दिलेल्या तक्रारी वरुन पोलीस ठाणे सदर बाजार गुरनं. ४६४/२०२५ कलम ३०८(५),१४०,(२),३५२,३५१ (२), ३ (५) भा. न्या.सं.प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता. पोलीस अधीक्षक, जालना व अपर पोलीस अधीक्षक, जालना यांनी



सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेवून आरोपी अटक करणे बाबत सुचना दिल्या होत्या. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपींचा शोध घेत होते. परंतु आरोपींनी त्यांचे वापरात असलेले मोबाईल बंद करुन फरार झाले होते. दिनांक ०५/०७/२०२५ रोजी गुन्हयातील आरोपी अक्षय रविंद्र गाडेकर व विठ्ठल भिमराव अंभोरे असे दोघेजण एका काळया रंगाचे स्प्लेंडर मोटारसायकलसह विशाल कॉर्नर जालना येथे बायपास रोडवर थांबलेले आहे अशी माहिती प्राप्त झाली. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपीकडे जात असतांना दोन्ही आरोपींना संशय आल्याने त्यांनी मोटारसायकल जागेवर सोडुन शेतात पळ काढला, पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी दोन्ही आरोपींचा एक ते दीड किलोमीटर पाठलाग करुन त्यांना शिताफीने पकडले आहे. आरोपी नामे १) अक्षय रविंद्र गाडेकर वय २२ वर्ष रा. पिंपळ शेरमुलकी ता. भोकरदन जि. जालना २) विठ्ठल भिमराव अंभोरे वय २५ वर्ष रा. व्दारकानगर जालना यांना गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता दोन्ही आरोपी व त्यांचा एक साथीदार ३) राहुल रत्नाकर गंगावणे रा. चांधई एक्को ता.भोकरदन असे तिघांनी चंदन गोलेच्छा यांचे अपहरण करुन पिस्टलचा धाक दाखवुन त्यांचेकडुन ०४ लाख रुपये खंडणी घेतली असल्याचे कबुल केले आहे. दोन्ही आरोपींच्या ताब्यातून गावठी बनावटीचे ०१ पिस्टल, रोख ७७०००/- रु. एक स्प्लेंडर मो.सा.०३ मोबाईल असा एकूण २,१०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई श्री. अजयकुमार बंसल, पोलीस अधीक्षक जालना श्री. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक जालना श्री. अनंत कुलकणी उपविभागीय पोलीस अधिकारी जालना यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, जगदीश बावणे, रुस्तुम जेवाळ कैलास खाडे, दिपक घुगे, सागर बाविस्कर, किशोर पुंगळे, सचीन राऊत, धिरज भोसले, अशोक जाधवर (चालक) सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com





नांदेड- आषाढी एकादशी निमित्त चक्रधर स्वामीनगर, पवननगर तरोडा येथील विठ्ठल रुक्मीनी मंदीरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

## युवासेना शहर प्रमुख हजारी यांच्या निवेदनाची दखल; नगरपंचायतकडून ३४ मोकाट जनावरे कोंडवाड्यात

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०६ जुलै -**

माहूर नगरपंचायतीच्या बेजबाबदारपणा मुळे अपघातात एका वळूचा जीव गेला!' या मथळ्याखाली दैनिक तरुण भारत मध्ये आज दि.०६ जुलै रोजी बातमी प्रकाशित होताच या बातमीची तात्काळ दखल घेऊन रविवार कार्यालयीन सुट्टीचा दिवस असतानाही मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्या आदेशानुसार शहरातील मुख्य महामार्गावर मुक्त संचार करत ठाण मांडून बसत वाहतूकीला अडथळा निर्माण करुन अपघातास कारणीभूत ठरत असलेल्या मोकाट जनावरांविरुद्ध नगरपंचायतीच्या पथकाने युद्धस्तरावर धरपकड मोहीम राबवून दिवसभरात ३ वळूसह गाय व वासरांसहीत तब्बल ३४ जनावरांच्या विरोधात जप्तीची कारवाई करुन त्यांना कोंडवाड्यात टाकण्यात आले. यासंदर्भातील लेखी निवेदन युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांनी नगरपंचायत मुख्याधिकारी विवेक कांदे यांना दिले होते.



माहूर नगरपंचायतला दि. २५ जून रोजी निवेदन देणारे युवासेना शहर प्रमुख विजयसिंह हजारी यांच्या निवेदनाची नगरपंचायत प्रशासनाकडून तब्बल दहा दिवसांनंतर उशीरा का होईना अखेर दखल घेण्यात आली. याबद्दल विजयसिंह हजारी यांचे नागरीकांमधून अभिनंदन केले जाते आहे. परंतु दुःख एकाच गोष्टीचे वाटते कि, मोकाट निष्पाप वळूचा ०४ जुलै रोजी महामार्गावर झालेल्या अपघातात जीव गेल्यानंतर व त्यासंदर्भातील बातमी दैनिक तरुण भारत मध्ये दि.०६ जुलै रोजी प्रकाशित झाल्यावर नगरपंचायत प्रशासन खडबडून जागे झाले आणि रविवारी सुट्टी असूनही ३ वळू व गाय वासरांसह तब्बल ३४ पाळीव व मोकाट जनावरांच्या विरोधात जप्तीची कारवाई करत त्यांना कोंडवाड्यात घालण्यात आले. याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. परंतु, हीच कारवाई जर वेळीच करण्यात आली असती तर, एका निष्पाप वळूचा जीव नक्कीच वाचला असता हे ही तेवढेच खरे.

सदरील मोकाट जनावरांविरुद्ध धरपकड व जप्तीची कारवाई विवेक कांदे मुख्याधिकारी यांच्या आदेशावरून पथक प्रमुख संदीप गजलवाड, विशाल मरेवाड ,विजय शिंदे,गणेश जाधव,अनिल खडसे, रामसिंग ठाकुर,इंदल जाधव,शेख नईम, समाधान जाधव,अविनाश बर्डे, प्रवीण शेंडे, संदिप राठोड,जिवन खडसे, गायकवाड,संदिप गोस्वामी, बोरकर या नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## गटविकास अधिकारी वाजे यांचा निरोप तर मिरजकर यांचे स्वागत

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.०६ जुलै -**

नायगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी एल. आर. वाजे यांची बदली धाराशिव जिल्ह्यातील भूम येथे झाल्याने ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्य वतीने २ जुलै रोजी त्यांचा निरोप समारंभ आणि नव्याने रुजू झालेले गटविकास अधिकारी संजय मिरजकर यांचे स्वागत मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात ग्रामसेवकांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मानही करण्यात आला.

या प्रसंगी धर्माबादचे गटविकास अधिकारी प्रफुल तोटावाड, उपविभागीय अभियंता डी. आय. होनराव, विस्तार



अधिकारी प्रकाश जाधव, गणेश टोनगे, कृषी अधिकारी जोधळे, कक्ष अधिकारी सिनगिकर, सेवानिवृत्त अधिकारी शामसुंदर शिंदे, शाखा अभियंता गोणेवार, सहाय्यक अभियंता मयुर जिरवणकर, संघटनेचे तालुकाध्यक्ष टी. जी. पाटील (रातोळीकर) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात ग्रामसेवक संघटनेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये बालाजी राजू मदेवाड, श्वेता विठ्ठलराव कानगुले, श्रद्धा अलका मुगटकर, समीक्षा विनायक कोंडावार या विद्यार्थ्यांना त्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल सन्मानचिन्ह, पुस्तक, शाल आणि पुष्पहार देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष टी. जी. पाटील (रातोळीकर) यांनी केले. सूत्रसंचालन नागेश यरसनवार व गजानन इबिते यांनी तर आभार प्रदर्शन सूर्यकांत बोन्डले यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### जि.प.कें.प्रा.कन्या शाळा हिमायतनगर येथे २ हजार वह्यांचे वाटप



**हिमायतनगर, दि.०६ जुलै -** हिमायतनगर येथील दिनांक ४ जुलै रोजी जि.प.के.प्रा.कन्या शाळा येथे स्व.श्री.लवचंदभाई त्रिभुवनदास व्होरा यांच्या स्मरणार्थ व्होरा कुटुंबातर्फे तसेच महावीर राहत केंद्र घाटकोपर (पूर्व) मुंबई यांच्या वतीने व शाळेचे माजी शिक्षण समिती अध्यक्ष श्री.किरणभाऊ बिच्चेवार यांच्या पुढाकाराने शाळेतील एकुण ६०० विद्यार्थ्यांना २००० वह्या/रजिस्टर यांचे वाटप करण्यात आले. यावेळी रामराव सूर्यवंशी , ठाकरे, आशिष सकवान, होळकर, मिरजगावे,सह पालक उपस्थित होते. किरणभाऊ बिच्चेवार म्हणाले की,शाळेमध्ये शिकणाऱ्या गोरगरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व प्रेरणा मिळावी यासाठी या वह्या/रजिस्टर वाटप करण्यात येत आहेत. आपली कन्या शाळा ही आपले एक कुटुंब आहे.आपल्या शाळेतील विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेत आहेत. शाळेला मदत करण्यासाठी सर्वांनी शाळेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे व शाळेच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी सर्वांनी मदत करावी.लोकसहभाग वाढवावा, आपल्या पाल्याच्या शैक्षणिक सर्वांगीण विकासासाठी शाळेला सर्वांनी सहकार्य करावे असे आव्हान केले.

यावेळी मुख्याध्यापक संजय चोले, संजय कदम,सी.चव्हाण, नाथा गंगुलवार, सचिन जाधव, मुल्ला सर साताळे सर, बनसोडे , भिमराव हनवते , संतोष पोकलेवाड सर, शाकेर सर, आशपाक खान सर, आला कैलास जाधव , गौतम हनवते सर, प्रशांत जाधव , प्रदिप नरारे, कन्नावार मॅडम, रामदिनवार मॅडम, नसरीन फातेमा मॅडम, काकडे मॅडम,कु.भक्ती पिटलेवाड मॅडमसह सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमीत्त बैठकीचे आयोजन

**लोहा** -तालुक्यातील सर्व जनतेला अहावान करण्यात येते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जंयती उत्सव १ आगष्ट २०२५ रोज



शहरात साजरी करण्याचे ठरविले आसुन ७ आगष्ट २०२५ रोजी अण्णाभाऊ साठे संस्कृती सभागृह जुना लोहा येथे सायंकाळी बैठक आयोजित केली आहे सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन पांडुरंग दाढेल यांनी केले आहे. तालुका व शहरातील तमाम बांधवानी या बैठकीत उपस्थित राहुन सहकार्य करावे अनिल दाढेल ,देवीचंद पिसोळे, नंदु दाढेल ,उध्दव कंधारे , चांदु पाटोळे , संदीप सावळे, गणेश दाढेल, श्रिधर दाढेल, चंदु धोगडे पिराजी कंधारे, मिलीद वाघमारे ,गोपाळ लोंढे, यांच्या वतिने करण्यात आले आहे.

### आषाढी एकादशी निमित्त मॉडर्नने काढली समाज प्रबोधनात्मक दिंडी

**उमरी**-प्रतिवर्षाप्रमाणे उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतिने आषाढी एकादशी निमित्ताने शहरातील प्रमुख



रस्त्यावरून दिंडी काढून संताचे विचार समाजापुढे मांडून समाजप्रबोधनाचे काम केले आहे. श्री. रूक्मिनी पांडुरंगाचे वेषातील चिमुकल्यांनी आणि त्यांचे पाठी मागील संताच्या वेषभुषेतील दिंडीत सहभागी चिमुकल्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. संताच्या पदस्पर्शाने पुणीत झालेल्या उमरी नगरीत सकाळी टाळ, मृदुंगाचे व विठ्ठल नामाचे जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले होते.विविध संतानी समाज उपयोगी दिलेले संदेश चिमुकल्यांनी जनते पर्यंत पोहंचविले. तसेच वारीत खेळल्या जाणार्या वारकर्यांचे विविध खेळांची प्रात्यक्षिके शहरातील चौकाचौकातून विद्यार्थ्यांनी करून दाखविली.सध्याचे परिस्थितीत संताचे सामाजिक विचार आवश्यक असून त्याची जाणीव विद्यार्थ्यांचे मनात बाल वयापासून रूजावेत ह्यासाठी मॉडर्न इंग्लिश स्कूल तर्फे असे उपक्रम राबविण्यात येतात असे प्रतिपादन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा संजय कुलकर्णी यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील संपूर्ण शिक्षकवृंदानी परिश्रम घेतले.

## चिमुकल्यांनी शैक्षणिक दिंडी काढून गावकऱ्यांचे वेधले लक्ष

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि.०६ जुलै -**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने जय किसान माध्यमिक विद्यालय कोल्हे बोरगाव येथील चिमुकल्यांच्या शैक्षणिक दिंडीने,विद्यार्थ्यांनी केलेल्या वेशभूषा आणि ' मला शाळेत जायचं हाय' या गाण्यावर पावलांचा ठेका धरून वारीचे गावात सुंदर प्रदर्शन करून संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. तर वृक्ष लावा वृक्ष जगवा, मुलांना शाळेत पाठवा,व्यसनमुक्ती यावर आधारित फलक दाखवून शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न या दिंडीच्या माध्यमातून चिमुकल्यांनी केला.

महाराष्ट्राचे दैवत पांडुरंगाच्या दर्शनासाठी महाराष्ट्र नाही तर आजुबाजूच्या कर्नाटक तेलंगणा आंध्रप्रदेश यासह बऱ्याच राज्यातील भक्तगण दरवर्षी न चुकता वारीमध्ये जातात वारीचे औचित्य साधून एकादशीच्या आदल्या दिवशी मोठ्या जल्लोषात व हर्ष उल्हासात



टाळ मृदंग भजन संकीर्तन करीत गावभर विठ्ठल रूखमाई,संत तुकाराम,संत नामदेव,मीराबाई यासह अनेक संतांच्या वेशभूषा करून तसेच वारकऱ्यांनी पांढरा पोशाख, डोक्यावर टोपी व मुलींनी लुगडे तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन मोठ्या आनंदाने वारीमध्ये सहभागी झाले. वारीतील विठ्ठल रुक्माई चे गावातील अनेक स्त्रियांनी जागोजागी पूजन करून स्वागत केले, मुलांना काही जणांनी चॉकलेट वाटप तसेच पिण्याचे पाण्याची व्यवस्था केली होती. वारीमध्ये गावातील असंख्य प्रतिष्ठित नागरिकांनी सहभाग घेतला यामध्ये माजी उपसरपंच विठ्ठलराव उपासे, पेंटाजी दासपल्ले, राम महाराज डुमनवाड, पो. पा. गणपत करेवाड, शंकरराव मोघे, लक्ष्मणराव मुंडकर, मोहनराव मोघे, सुरेश धुळेकर, हनुमंत पिटलेवाड, लक्ष्मण गोपछडे, चंद्रकांत गोपछडे, शिवराज गोपतवाड, विठ्ठल कोत्तापल्ले, गोपाळ महाराज ठाकूर, सुरेश पाटील शेटकर, साईनाथ कोत्तापल्ले, विठ्ठल परसनवाड, पोशटी अकलवाड,यादव आंबेराव, पांडू पाटील आंबेराव, गणेश राखेवार, गणपत महाराज, साईनाथ गोपछडे, इंदरबाई उत्तरवाड, धूरपटतबाई मानेमोड, चंदरबाई सोमशेट्टे, राजाबाई डुमनवाड, जमनाबाई परसनवाड, विठाबाई पारटवाड, सौ. गोपछडे यांनी सहभाग घेतला, सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विजय होपळे, साहेबराव पांचाळ, सुवर्णकार गणेश, हासगुळे बळीराम, लगडे काशिनाथ, अशोक होरे, सुभाष आगसे,पाटील संतोष,अतुल गोपछडे, रूपाताई गोपछडे, योगेश हसणाळे, अंकिता पाटील, गोविंद मदेवाड, हनुमंत उत्तरवार, निळकंठ मुठनवाड, सावित्राबाई मुठणवाड यांनी प्रयत्न केले.

## लोहा पोलीसांची जुगार अड्यावर धाड; तीन लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०६ जुलै -**

जिल्हा पोलिस अधिक्षक आभिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या टिमने खुड्याची वाडी येथे खबऱ्याच्या मदतीने जुगारावर धाड टाकुन ३ लाख ५ हजार ९०५ रुपायाच्या मुद्देमाल सह आरोपीला ताब्यात घेतला.

लोहा पोलिस स्टेशन अंतर्गत खुड्याचीवाडी येथे चितपट नावाचा जुगार खेळला जात होती याची खबर मिळताच पोउपनि संतोष पाटील, सपोउपनि राठोड, पोहेका नरेंद्र तिडके, पोडेका नारायण कदम, पोका कैलास गिरे, होमगार्ड संदीप कदम, सचिन केंद्रे, कैलास मुसळे, प्रदिप भोसीकर, शिवहार जाकापुरे, शेख शादुल, शेख गुलाम असे पोलीस स्टेशन लोहा हद्दीत पेट्रोंलीग करीत असताना खबऱ्यामार्फत खुड्याचीवाडी शिवारात काही ईसम चितपट नावाचा जुगार खेळत असल्याची माहीती मिळाली घटनास्थळी जाऊन जुगार आड्यावर छापा मारला असता यामध्ये संग्राम केंद्रे, अशोक राठोड, कामाजी फुलवळे, चैतन्य शिदे, खंडू आनापुरे, आदेश वडवोळे, नागोराव कांबळे, रघुनाथ शिंदे हे चितपट नावाचा जुगार खेळत असताना मिळुन आले त्यांची झडती घेतली असता नगदी १२ हजार ९०० रुपये, घटनास्थळी चार मोटार सायकल त्यांची अंदाजे किंमत २ लाख रुपये व नऊ मोबाईल त्याची अंदाजे किंमत ९३ हजार रुपयाचा मुद्देमाल असा एकुन३ लाख ५ हजार ९०५ रुपयाचा मुद्देमाल मिळून आला वरील जुगार खेळना-या ईसमा विरुध्द पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्याचा तपास बिट अंमलदार प्रकाश साखरे हे करत आहेत.

## हदगाव येथे गोर सेनेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.०६ जुलै -**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त दरवर्षी गोर सिकवाडी, गोर सेना या गोर बंजारा समाजातील सामाजिक संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा,पालकांचा व विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जातो.

या वर्षी हा कार्यक्रम रविवारी दि. ६ जुलै रोजी संत रोहिदास महाराज सभागृह येथे आयोजीत करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्यात तालुक्यातील अनेक तांड्यांतून गुणवंत विद्यार्थी, पालकवर्ग, नायक ,कारभार व नवयुक्त कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रमूख वक्ते म्हणून गजानन जाधव



पाटील व अजय चव्हाण यांनी शिक्षणाचे महत्त्व व थोर पुरुषांचे विचार सांगीतले आणि नागपुर मंत्रालय येथे नियुक्ती झालेले कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती लखन जाधव यांनी अभ्यास कसा करावा या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सत्कार सोहळ्याचे प्रस्ताविक गोर सेना तालुका प्रमूख रवि चव्हाण यांनी केले तर संचलन अमोल आडे, प्रदीप जाधव यांनी आभार व्यक्त केले. हा सोहळा पार पाडण्यासाठी सुनील राठोड,अमोल आडे, कृष्णा राठोड, श्रीकांत राठोड ,करण चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

### टोकण पेरणी यंत्राचा लाभ घ्यावा

**नांदेड, -** शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन क्षमता वाढविणे, कामाचा वेळ व कष्ट कमी करणे हे उद्दिष्ट ठेवून कृषी विभागामार्फत कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यात येत आहे. कृषि यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत मनुष्यचलित टोकण पेरणी यंत्राचा लाभ घ्यावा. हे पेरणी यंत्रावर अनुदान उपलब्ध असून शेतकऱ्यांनी या टोकण यंत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे. या मनुष्य चलीत पेरणी यंत्राचा वापर करुन एक मजुर एका दिवसात ३ ते ४ एकर सहजरीत्या गादी वाफयावर, बेडवर पेरणी करु शकतो.

## नरसी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी गजानन भिलवंडे



**तभा वृतसेवा**
**नरसी, दि.०६ जुलै -**

नायगांव तालुक्यातील नरसी येथील सेवा सहकारी सोसायटीच्या प्रशासकीय अध्यक्ष पदी गजानन पांडुरंग भिलवंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्तीचे नरसी चौकात फटाके फोडून जोरदार स्वागत करण्यात आले. नूतन प्रशासकीय अध्यक्ष गजानन भिलवंडे हे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांचे खंदे समर्थक मानले जातात.

तीन महिन्यापूर्वी नरसी सेवा सोसायटीची निवडणूक पार पडली होती. त्यानंतर एका जागेच्या निकालाचे प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत गेल्याने ही निवडणूक जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली होती.

सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर गांवकरी विकास पॅनलकडे ७ व आपलं पॅनलकडे ६ असे बलाबल झाले होते.परंतु गांवकरी विकास पॅनलचे सदस्य अशोक साखरे यांचे दुर्दैवी निधन झाल्याने दोघांची संख्या समसमान झाली. याच दरम्यान चेअरमनची निवड करण्यासाठी सहाय्यक निबंधक यांनी दोनवेळा बैठक बोलावून देखील गांवकरी विकास पॅनलचे ६ सदस्य गैरहजर राहिले. कोरम पूर्ण नसल्याने गणपूर्ती अभावी दोनदाही बैठक तहकुब झाली.त्यामुळे जी.आर.कौरवार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था नायगांव यांनी नरसी सेवा सोसायटीवर प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण केली.

त्या माध्यमातून ४ जुलै रोजी काढलेल्या आदेशानुसार माजी चेअरमन गजानन पांडुरंग भिलवंडे यांची प्रशासकीय अध्यक्ष पदी नियुक्ती झाली असून वसंत कस्तुरे व शंकर कोकणे सदस्य असणार आहेत.माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांच्या प्रयत्नाने हे प्रशासकीय मंडळ नियुक्त झाले असून या नियुक्तीचा असंख्य समर्थकांनी नरसी चौकात ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढून फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला. त्यानंतर श्रावण पाटील भिलवंडे यांच्या निवासस्थानी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्रावण पाटील यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

याप्रसंगी पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, माजी चेअरमन मारोती भिलवंडे, सय्यद खलील, त्र्यंबक डाके, उपसरपंच आलिम पटेल, गंगाधर वडगावे, साईनाथ अकमवाड, नारायण खनपटे, हानमंत मिसे, किसन खनपटे, विनोद भिलवंडे, भीमराव पांचाळ, शंकर जानोरे , बालाजी पांचाळ, रोहित भिलवंडे, रमेश वासरे, माधव तेलमवार , दिगंबर भिलवंडे , जनाजी खनपटे , लुटे साहेब, विलास गौड, प्रकाश वडगावे, राजेश वडगावे, कैलास पांचाळ, मारोती वडगावे, श्याम बोधणे, केशव सुर्यवंशी, सह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकाराच्या घरात भिंतीवर ६फुट लांबीचा इंडियन कोब्रा; सर्पमित्रांनी नागराजास पकडून दिले जीवदान

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०६ जुलै -**

येथील पत्रकार बजरंगसिंह हजारी यांच्या राहत्या घरी दि. ०४ जुलैच्या रात्री १०:३० च्या सुमारास टिनपत्राखाली भिंतीवर एक भलामोठा सहा फूट लांबीचा अत्यंत विषारी स्पेक्टॅकल्ड कोब्रा जातीचा साप गुंडाळी मारुन बसलेल्या अवस्थेत आढळून आल्याने घरातील सर्वांची पाचावर धारण बसली.याविषयीची माहिती कळताच या भयंकर नागराजाला पकडण्यासाठी तब्बल पाच सर्पमित्रांनी तातडीने स्थळ गाठले व जवळपास दोन तासाच्या कठीण परिश्रमानंतर सदरील इंडियन कोब्राला पकडून एका सुरक्षित पिशवीत घालून जंगलात सुरक्षित स्थळी नेऊन सोडून जीवनदान दिले.

भारतातील मुख्य भूमिवरील सर्वात जास्त आढळणारी विषारी सापाची प्रजाती स्पेक्टॅकल्ड कोब्रा (नाजा) ज्यास महाराष्ट्रात ग्रामीण भागात साधारणपणे गव्हाळ्या नाग



म्हणून ओळखतात.हा अत्यंत विषारी साप माहूर येथील पत्रकार बजरंगसिंह हजारी यांच्या राहत्या घरी शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घरातील भिंतीवर चक्क आराम अवस्थेत आढळून आला. सुदैवाने याकडे हजारी यांचे वेळीच लक्ष गेल्याने पुढील संभावीत धोका टळला. विशेष म्हणजे यादरम्यान जवळपास दोन तास हा नागराज एकाच ठिकाणी शरीराची गुंडाळी करून दडून बसला होता.

दरम्यान सर्पमित्र मंगेश जोगदंड, भीमाशंकर सूर्यवंशी, संदीप पतंगे,शिवा,व इतर एक यांनी सदरील नागराजाला रात्री साडेबाराच्या सुमारास मोठ्या हुशारीने सुरक्षितता बाळगत दोन तासाच्या कठीण मेहनतीनंतर पकडल्यावर हजारी यांच्या कुटुंबीयांचा जीव भांड्यात पडला.

सध्या सर्प प्रजातीचा मार्च ते जुलै हा प्रजननाचा कालावधी असून, पावसाळ्याच्या दिवसात हे सरपटणारे प्राणी अंडी देऊन ती उबवण्यासाठी मनुष्याच्या घरांत प्रवेश करतात. तर भक्ष्य पकडण्यासाठी घरात लपून बसतात. यातील विषारी सापांच्या चावण्यामुळे जीव जाण्याची भीती असल्याने नागरिकांनी आपल्या घरात स्वच्छता ठेऊन काळजी घ्यावी असे आवाहन या सर्पमित्रांनी केले आहे.